दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड शनिवार,दि.७ डिसेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक१२१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

# चैत्यभूमीवर लोटला भीमसागर!

## महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

## आंबेडकरी जनतेकडून विविध उपक्रमाने महापरिनिर्वाण दिन

## देशभरातून लाखो अनुयायी दादरच्या चैत्यभूमी येथे दाखल

## बीडमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन




मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यंदाही महापरिनिर्वाण दिनानिमित्त १ डिसेंबरपासून लाखो अनुयायी मुंबईतील त्यांचे समाधीस्थळ असलेल्या चैत्यभूमी परिसरात दाखल झाले होते.त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातही भिम अनुयायांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विविध उपक्रम राबवून महापरिनिर्वाण दिनी अभिवादन केले.

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शुक्रवार (दि.६) डिसेंबर रोजी ६८ वा महापरिनिर्वाण दिन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो अनुयायी दादरच्या चैत्यभूमी येथे येतात. समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री भीमराव रामजी आंबेडकर यांनी ६ डिसेंबर १९५६ रोजी अखेरचा श्वास घेतला. त्यानंतर ६ डिसेंबर हा दिवस भारतात महापरिनिर्वाण दिवस म्हणून ओळखला जाऊ लागला. दरवर्षीप्रमाणे यंदाही महापरिनिर्वाण दिनानिमित्त १ डिसेंबरपासून लाखो अनुयायी मुंबईतील त्यांचे समाधीस्थळ असलेल्या चैत्यभूमी परिसरात दाखल झाले. शुक्रवारी लाखो अनुयायांनी चैत्यभूमी स्तूपात ठेवलेल्या आंबेडकरांच्या अस्थीकलश व प्रतिमेस अभिवादन करत बाबासाहेबांचे दर्शन घेतले.



### मुख्यमंत्र्यांनी केले अभिवादन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार,राज्यपाल सीपी राधाकृष्णन व अन्य राजकीय नेते, कार्यकर्ते देखील उपस्थित होते.

### अनुयायींची व्यवस्था...

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनासाठी मुंबईत येणाऱ्या अनुयायांकरिता मुंबई महापालिकेने विविध सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिल्या होत्या. दादर चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान 'राजगृह' यासह आवश्यक ठिकाणी अनुयायींची व्यवस्था करण्यात आली होती.

# राज्यसभेत सापडले नोटांचे बंडल

### चर्चेतले:सभापतींनी दिले चौकशीचे आदेश



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आज पुन्हा गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी संसदेत 'काँग्रेस का हाथ सोरस के साथ' घोषणा दिल्याचा विरोधी पक्षांच्या खासदारांनी तीव्र निषेध नोंदवला. यानंतर लोकसभेचे सत्र दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. मात्र यापूर्वी राज्यसभेत काँग्रेस खासदाराच्या जागेवरून नोटांची बंडल सापडल्याची माहिती राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी दिली. या प्रकरणावरून देखील सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांशी भिडल्याचे पाहायला मिळाले.

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी काल नियमीत तपासणीदरम्यान सभागृहात चलमी नोटा सापडल्याचा आरोप केला . सुरक्षा अधिकार्यांना पान २ वर...

# अवकाळीचे पंचनामे करून भरपाई द्या

### निवेदन:आ.संदीप क्षीरसागरांची प्रशासनाकडे मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रासह बीड जिल्ह्यात शुक्रवारी (दि.६) रोजी सकाळपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. या अवकाळी पावसाने शेती पिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले आणि होत आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई देण्यासाठी कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.



शुक्रवारी (दि.६) रोजी सकाळपासूनच बीड मतदारसंघातील बीड आणि शिरूर का. तालुक्यासह बीड जिल्ह्यात अवकाळी पाऊस होत आहे. या पावसाने शेतीपिकांचे आणि पान २ वर...

# डॉ.योगेश क्षीरसागरांनी घेतली भेट

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते पार्थ अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट घेतली.पार्थ पवार यांनी बीड विधानसभा निवडणुकीबाबत चर्चा केली. तसेच, पक्षाच्या कामाची माहिती जाणून घेतली. यावेळी पार्थ पवार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी नगरसेवक रविंद्र कदम, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे उपस्थित होते.



# बोधिसत्व फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक

### नियोजन: सामाजिक उपक्रमातून महापरिनिर्वाण दिन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी


भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बोधिसत्व फाउंडेशन तर्फे एक वही एक पेन वाटपाचा कार्यक्रम आयोजित करून महामानवाला आदरांजली वाहण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. पांढरे डी. व्ही., प्रमुख पाहुणे मा. प्रकाश उजगरे तसेच प्रमुख उपस्थिती डॉ.सुरेश शिंदे तसेच सर्व वरिष्ठ ग्रामस्थ, पत्रकार, शाळेचे सर्व शिक्षक पान २ वर...

### खळबळ | अंबाजोगाईच्या 'स्वाराती' रुग्णालयातील प्रकार

# सरकारी दवाखान्यात बनावट कंपनीचे औषधे

अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गोरगरीब रुग्णांवरील उपचारासाठी आधारस्थान असलेल्या अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ठाणे आणि सुरत (गुजरात) मधील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.




सध्याच्या खाजगी रुग्णालयातून मिळणाऱ्या महागड्या उपचारपद्धतीमुळे गोरगरीब आणि सर्वसामान्य रुग्ण स्वस्त आणि खात्रीपूर्वक उपचारासाठी स्वाराती रुग्णालयास प्राधान्य देतात. एका अर्थाने हे रुग्णालय गोरगरिबांसाठी जीवनवाहिनी आहे. मात्र या रुग्णालयात महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या औषध पुरवठा कंत्राटदाराने बनावट औषधीचा पुरवठा केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले आहे. या प्रकरणी औषधी निरिक्षक मनोज पैठणे यांच्या फिर्यादीवरून सुरेश दत्तात्रय पाटील, मिहीर त्रिवेदी (रा. भिवंडी, जि.ठाणे),द्विती सुमित त्रिवेदी (रा. सुरत) आणि विजय शैलेद्र चौधरी (रा. मिरा रोड ठाणे) या चौघांवर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बनावट औषध निर्मिती आणि विक्रीच्या मागे आंतरराज्यीय टोळी असून अनेक राज्यात त्यांचे जाळे पसरले असण्याची शक्यता देखील फिर्यादीत व्यक्त करण्यात आली आहे. पुढील तपास एपीआय कांबळे करत आहेत.

# महाराष्ट्र दुष्काळमुक्तीसाठी नदीजोड प्रकल्प

### कार्यक्रम:मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे स्पष्टीकण

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीला बहुमत मिळालं. यानंतर काल (५ डिसेंबर) रोजी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे वरिष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले आहे. या निवडणुकीत राज्यातील जनतेने शिवसेना (एकनाथ शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि भाजपा या पक्षांवर विश्वास दाखवला असून त्यांना



प्रचंड बहुमत दिलं आहे. त्यामुळे या तीन पक्षांच्या सरकारवर लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची मोठी जबाबदारी असणार आहे. यादरम्यान राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्यांदाच फडणवीसांनी राज्यात आगामी काळात कोणत्या योजना राबवल्या जातील याबद्दल भाष्य केले आहे. यावेळी त्यांनी राज्य कायमचे दुष्काळ मुक्त करण्यासाठीची योजना देखील त्यांनी बोलून दाखवली आहे. फडणवीस हे डीडी सह्याद्रीला दिलेल्या विशेष मुलाखतीत बोलत होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र आता थांबणार नाही, महाराष्ट्राने आता कौल दिला आहे. येत्या काळात गोष्टी तर अनेक करायच्या आहेत. योजनादेखील पान २ वर...

## सावली, सावट, सौजन्य, सावज!

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नव्या रचनेत उपमुख्यमंत्रीपद स्वीकारणार नाहीत,' 'शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले नाही तर आम्ही पण मंत्रीपदाची शपथ घेणार नाही' हा त्यांच्या साजिंद्यांचा पवित्रा हे फार फार तर विनोद ठरतात. त्यातही केविलवाणे असे. शपथविधीच्या काही तासांपर्यंत शिंदे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारणार की नाही, ही संदिग्धता कायम होती, हाही असाच विनोद. इलेक्ट्रॉनिक माध्यमे बराच काळ या विनोदावर चर्चा करत राहिली. त्यांचे ठीक. एरवीही वेळ कसा भरून काढायचा असा प्रश्न त्या बिचाऱ्यांस असतो. शिंदे यांनी काही काळापुरता तरी तो सोडवला. तथापि निवडणुकांचे निकाल लागले त्या दिवसापासून काही गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट होत्या. मुख्यमंत्रीपद भाजपकडे जाणार, मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचीच निवड केली जाणार आणि एकनाथ शिंदे–अजितदादा यांना उपमुख्यमंत्रीपदावर समाधान मानावे लागणार. यातील अजितदादांचा प्रश्न नाही. ते उपमुख्यमंत्रीपदाला चटावलेले आणि सरावलेलेही आहेत. या पदावर समाधान मानण्याची त्यांची चिकाटी तशी कौतुकास्पद. अर्थात त्याखेरीज त्यांना पर्याय नाही, हेही खरेच. हेच सत्य एकनाथ शिंदे यांच्याबाबतही लागू होते. पण त्यांना ते स्वीकारणे जड जात होते. साहजिक आहे तसे होणे. मुख्यमंत्रीपदावरून उतरायचे आणि लगेच उपमुख्यमंत्रीपदावर समाधान मानायचे ही अवघड बाब. पण ती गोड मानून घेण्याखेरीज त्यांस पर्यायही नाही. तो नव्हताही. त्यामुळे 'शिंदे हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार की नाही' या प्रश्नास तो विचारण्यास सुरुवात झाल्यापासून अर्थ नव्हता. जे झाले ते नाटक होते. तेही अगदीच किरकोळ आणि लुटुपुटुचे. या नाटकात खुद्द शिंदे यांची नायकाची भूमिका काढून घेतली गेलेली असताना त्यांच्या बाकीच्या प्याद्यांच्या आवेशास काहीही अर्थ नाही. हे वास्तव लक्षात घेतल्यास शिंदे यांची अडचण सहज समजून घेता येईल.म्हणजे २०२२ पर्यंत त्यांचा काळ आधी बाळासाहेब ठाकरे आणि नंतर उद्धव ठाकरे यांच्या सावलीत गेला. आपण आनंद दिघे यांची सावली होतो, याचा तर शिंदे यांना अभिमान होता. त्याही काळात त्यांना महत्त्व होते. पण सावलीत राहून. नंतरच्या बंडामुळे त्यांना मुख्यमंत्रीपद मिळाले. त्यामुळे या पदाच्या सावलीत त्यांना पुढची अडीच वर्षे वावरता आले. या पदाची ताकदच अशी असते की बाबासाहेब भोसले, शिवाजीराव निलंगेकर पाटील आदी तुलनेने चेहराशून्य नेत्यांनाही मोठे करते. त्या तुलनेत शिंदे यांचे कर्तृत्व निश्चितच लक्षणीय आहे. शिवसेनेसाठी महत्त्वाचा ठाणे जिल्हा त्यांनी आपल्या खांद्यावर उचलून धरला होता. त्यात त्यांची कष्ट करण्याची क्षमता. यामुळे खरे तर सेनेत असतानाही मुख्यमंत्रीपदाचे दावेदार ठरू शकले असते. पण ते पद न मिळाल्यामुळे आणि मिळण्याची शक्यताही नसल्यामुळे भाजपने त्यांना हेरले आणि फुटीच्या जाळ्यात शिंदे सहज ओढले गेले. त्यात भाजपने त्यांना मुख्यमंत्री केल्यामुळे शिंदेंचा पुढचा प्रवास सुलभ झाला. त्या प्रवासात शिंदे यांना मिळालेला आधार दुहेरी होता. एक म्हणजे मुख्यमंत्रीपदाने दिलेला आणि दुसरा हे पद देणाऱ्या भाजपच्या 'महाशक्ती'कडून मिळत असलेला. पण निवडणुका झाल्या, भाजपने स्वत:च्या घवघवीत यशासाठी आखलेली चतुर समीकरणे यशस्वी ठरली. त्याचा थेट परिणाम म्हणजे शिंदे यांनी हे दोन्हीही आधार गमावले. मुख्यमंत्रीपद त्यांना भाजपच्या यशामुळे नाकारले गेले आणि ते पद नसल्यामुळे दिल्लीच्या 'महाशक्ती'चीही त्यांना आधार देण्याची गरज संपली.म्हणजे यापुढे शिंदे यांना जी काही उरलीसुरली शिवसेना आहे, ती स्वत:च्या बळावर चालवावी लागेल. या शिवसेनेच्या यशात यापुढे भाजपला स्वारस्य असेलच असे नाही. त्या पक्षास रस होता मूळ शिवसेना फोडण्यात. त्यात ते यशस्वी झाले. आता 'अर्ध'मेल्या शिवसेनेचे काय करायचे हा त्या शिवसेनेच्या नेत्यांचा प्रश्न. भाजपस त्यात रस असण्याची शक्यता नाही. तथापि याच विधानाचा पुढचा भाग असा की शिंदे यांच्या साजिंद्यांनाही त्यांच्या शिवसेनेत यापुढे रस असेलच असे नाही. खरे तर या मंडळींसमोर शिवसेना काय आणि भाजप काय वा राष्ट्रवादी काय किंवा काँग्रेस काय, हे मुद्देच नाहीत. त्यांचे लक्ष्य होते/ आहे/ असेल ते फक्त सत्ता या एका घटकात. ती जो देईल त्यामागे ही प्यादी धावतील. त्यामुळे 'शिंदे सरकारात सहभागी झाले नाहीत तर आम्हीही मंत्रीपद स्वीकारणार नाही' या यातील काही नेत्यांच्या आविर्भावावर तान्हे, शेंबडे, अगदी दुपट्यातले पोरही विश्वास ठेवणार नाही. सत्य असे की शिंदे यांनी खरोखरच मंत्रिमंडळात सहभागी न होण्याचा निर्णय अमलात आणला असता तर यातील काहींनी भाजपच्या दारात जाऊन आमच्या पदरात काही तरी वाढा, अशी भिक्षा मागण्यास कमी केले नसते. शिंदे नाहीत तर नाही, आम्हाला तरी काही द्या, असाच या मंडळींचा पवित्रा राहिला असता. आणि याची जाणीव असल्यानेच शिंदे यांनी मंत्रिमंडळात सहभागी होण्याचा शहाणपणा दाखवला. अन्यथा तेलही गेले, तूपही गेले या उक्तीप्रमाणे त्यांच्या हाती धुपाटणेही राहिले नसते. हीच बाब अजितदादा यांची. ते उगाच मंत्रिमंडळात मी जाणार नाही वगैरे नैतिक भूमिका घेण्याच्या फंदात पडले नाहीत. कायम सत्तासावलीत राहिलेले असल्याने त्यांच्यासाठी सत्तेखेरीज जगणे म्हणजे माशास पाण्याबाहेर जगावे लागण्याइतकेच अवघड. ती वेळच त्यांनी येऊ दिली नाही. हे दोघे काही महत्त्वाच्या खात्यांसाठी आग्रही असल्याचे सांगितले जाते. त्यातही फार तथ्य नाही. भाजप देईल ती खाती या उभयतांस स्वत:साठी आणि आपापल्या साजिंद्यांसाठी स्वीकारावी लागतील. उगाच 'गृह खाते मलाच हवे' आणि 'अर्थ खात्यावर माझा अधिकार' वगैरे शौर्यदर्शक विधानांमुळे कोणीही बधणारे नाही. त्यास इलाजही नाही. जे भाजप म्हणेल तेच त्यांस ऐकावे आणि करावे लागेल. म्हणून यापुढील काळात या पक्षांच्या अस्तित्वाचा प्रश्न त्या पक्षांपेक्षा भाजपलाच अधिक पडणार आहे. याचे साधे कारण असे की भाजपस यापुढील काळात या पक्षांच्या अस्तित्वाची अजिबात गरज नाही.आपल्या एकट्याच्या बळावर जो पक्ष २८८ सदस्यांच्या विधानसभेत १३२ पर्यंत पोहोचतो, त्यास अन्य कोणाच्या शिड्यांची गरज राहत नाही. म्हणजेच आणखी काही काळाने हे दोन पक्ष भाजपच्या गळ्यातील लोढणे बनणार. कधी इतकाच काय तो प्रश्न. तसे झाल्यावर भाजप आणखी किती काळ हे लोढणे वागवेल? आणि ते त्याने वागवावे का? यातील अजितदादा काय वा एकनाथ शिंदे काय! हे दोघे आतापर्यंत अनुक्रमे शरद पवार आणि ठाकरे कुटुंबीय यांच्या सावलीत वाढले. मोठे झाले. आता ही सावली संपली.

# हेळंब येथे खंडोबा यात्रेस सुरुवात

## परंपरा:पालखी सोहळा, वाघ्या मुरळी, कुस्त्यांची दंगल रंगणार

परळ/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील हेळंब येथे ७ ते ९ डिसेंबर दरम्यान ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या निमित्त शनिवारी दुपारी १ वा. श्री खंडोबाची पालखी मिरवणुक निघणार आहे. रात्री ११ वाजता शोभेची दारु उडवून अतिषबाजी केली जाणार आहे व २१ तोफांची सलामी दिली जाणार आहे. रविवारी रात्री ८ ते १२ दरम्यान वाग्या मुरळीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सोमवार दि.०९ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता जंगी कुस्त्याचा कार्यक्रम होणार आहेत. जंगी कुस्त्यासाठी प्रथम पारितोषिक २१,१०१/– ठेवण्यात आले आहे.

हेळंब येथे जागृत असे खंडोबाचे मंदिर आहे. चंपाषष्ठी निमित्त हेळंब येथे शनिवार पासुन तीन दिवशीय यात्रेस प्रारंभ होत आहे. यात्रेची तयारी जय्यत करण्यात आली आहे. विविध खेळणी साहित्याचे दुकाने गावात थाटण्यात आली आहे. शनिवारी राज्याच्या कानाकोपर्यातुन खंडोबाच्या दर्शनासाठी हेळंब मध्ये पन्नास हजारच्यावर भाविक दाखल होणार आहेत.

नवस केला की, पावतो अशी श्रद्धा आहे. त्यामुळे भाविक नवस बोलतात फळ मिळाल्यास ते नवस पूर्ण करतात. यासाठी पंचक्रोशीतील व ग्रामस्थ कितीही बाहेर असले तरी यात्रेनिमित्त ते दर्शनासाठी आवर्जून येतात. मुंबई, पुणे, छत्रपती संभजीनगर, हैदराबाद आणि अनेक राज्यातून भाविक दर्शनासाठी येतात. खंडोबा मंदिर हे जागृत देवस्थान आहे. चंपाषष्ठीला तीन दिवशीय यात्रा भरते, शनिवारी हेळंब येथील श्री हनुमान मंदिरापासुन श्री खंडेरायाच्या मुर्तीची मिरवणुक वाजत गाजत निघते, एक किलोमिटर अंतरावर असलेल्या खंडोबा मंदिरात ही पालखी येते, पुन्हा ही पालखी गावातुन जाते. या पालखी सोहळ्यात हेळंब व परिसरातील ग्रामस्थ उत्साहाने सहभागी होतात. रविवारी सायंकाळी हेळंब येथे वाघ्या मुरळ्याचा कार्यक्रम घेण्यात येतो व सोमवारी कुस्त्याच्या स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या आहेत. तीन दिवशीय यात्रेत परळी तालुक्यातील राज्यातील अनेक ठिकाणाहुन भक्त सहभागी होतात व खंडोबाचे मनोभावे दर्शन घेतात. या यात्रेची ग्रामस्थांनी जोरदार तयारी केली आहे. तीन दिवसीय यात्रेत दर्शनासाठी परळी वैजनाथ व परिसरातील ग्रामीण भागातुन भक्त मोठ्या प्रमाणात येतात. हेळंबच्या गावकरी मंडळाच्या वतीने भव्य यात्रा महोत्सव आयोजित करण्यात येतो.

### श्री खंडोबा यात्रेनिमित्त विविध कार्यक्रम

श्री खंडोबा मंदिर हे भव्य दिव्य आहे. खंडोबा मंदिरात प्राचीन काळापासून यात्रा भरते. मंदिरात लक्षवेधी व आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येते. या यात्रेची ग्रामस्थांनी जोरदार तयारी केली आहे. दिवसभर मंदिर परिसरात गावातील व परिसरातील भाविक तळीभांडार उचलणे, ओटी भरणे, भंडारा खोबरे उधळणं आदि कार्यक्रमास सुरुवात करतात व रात्री १० वाजता श्रींचा अश्वरूपी मूर्तीसह सवाद्य छबिना मिरवणूक काढून मंदिराला प्रदक्षिणा घालण्यात येते. यावेळी हलगीच्या तालावर खंडोबाचे वारू शिव मल्हार येळकोट. येळकोट घे च्या जय जयकारात बेभान होऊन नाचतात हे विलोभनीय दृश्य पाहण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.



# तलाठी रुपचंद आभारेंचे कार्य प्रेरणादायी

## मोहनदादा जगताप:वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील कोथरूळ व माजलगाव सज्याचे तलाठी रुपचंद आभारे यांच्या वाढदिवसानिमित्य आयोजित रक्तदान शिबिरात ३४ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे. तसेच महात्मा फुले शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वही, पेन, स्केल ई.वाटप करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मोहनदादा जगताप यांनी तलाठी रुपचंद आभारे यांचे प्रेरणादायी असुन प्रशासनात अश्या कर्मचारी व अधिकारी यांची कमतरता असल्याचे मनोगत व्यक्त केले.सदर कार्यक्रमास अध्यक्ष श्री. संतोष रुईकर ( तहसीलदार माजलगाव ) तसेच प्रमुख पाहुणे नितीनदादा नाईकनवरे,( मा. सभापती कृषी उ. बा. समिती )संतोष आबा यादव,( मा. संचालक कृ. उ. बाजार समिती )कल्याण आबुज,( मा. सभापती जिल्हा परिषद )ऍड. भानुदास डक, ( अध्यक्ष वकील संघ )विजयादादा शिंदे, ( मा. नगरासेवक )कृष्णा थावरे( सरपंच लिमगाव ), रामराजे रांजवन ( अध्यक्ष सराफा संघ ) शरद यादव (मा. नगरसेवक)हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिगंबर सोळंके, रामराजे रांजवन, विशाल देवकते, मुळे, अनिल माने, नईम भाई शेख,बाळासाहेब अळागडे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे, यांनी प्रयत्न केले.

# नागवंशी बुद्धविहारमध्ये महापरिनिर्वाण दिना निमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारत देशातच नव्हे तर संपूर्ण विश्वात ज्ञानाचा अंथाग महासागर बौद्धीसत्व विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना ६८ व्या महापरिनिर्वाण दिना निमित्त अभिवादन करण्यात आले.आज दि ६ डीसेबंर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता वडवणी शहरातील नागवंशी बौद्धविहार येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त अभिवादन करण्यात आले.सुरुवातीला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन दोन मिनिट स्तब्ध उभा राहुल श्रद्धांजली वाहीली. त्यानंतर वंदना घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न पत्रकार सतीश मुजमुले यांनी केला.त्यानंतर बार्टीचे समन्वयक महादेव तुरे यांनीही दोन शब्द बोलुन श्रद्धांजली अर्पित केली. शेवटी बौद्धविहारचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी सांगीतले एका विचाराचे दहा माणसं एकत्र येऊन कार्यक्रम यशस्वी करु शकतात आपण तर मोठ्या संख्येने आहोत.म्हणुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा रथ पुढे घेऊन जायचा असेल तर प्रत्येकाचं योगदान चळवळीसाठी आवश्यक आहे.

या अभिवादन सभेचे आयोजन भालेराव मित्र मंडळाचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी केले होते.यावेळी शहरातीलच नव्हे तर तालुकाभरामधुन चळवळीतील व विविध संघटनेतील मान्यवरांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.या अभिवादन सभेचं सुत्रसंचालन लोकमाणसचे संपादक सतीश वाघमारे यांनी केले.



## पान एक वरून

**राज्यसभेत सापडले**

राज्यसभा सभागृहातील आसन क्रमांक २२२ वर नोटांचे बंडल सापडले असल्याचे धनखड यांनी सांगितले. चलनी नोटा सापडलेली ही जागा सध्या काँग्रेसचे खासदार अभिषेक मनू सिंघवी यांना नेमून देण्यात आलेली आहे. दरम्यान या प्रकरणाची सध्या चौकशी सुरू असल्याचेही धनखड यांनी सांगितले.राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड म्हणाले की, मी सदस्यांना सूचित करत आहे की, काल सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर सभागृहाची नियमित तपासणी सुरू होती. सध्या अभिषेक मनू सिंघवी यांना देण्यात आलेल्या जागेवर चलनी नोटांचा गठ्ठा सुरक्षा अधिकार्यांनी जप्त केला आहे. ही बाब लक्षात आणून देण्यात आल्यानंतर मी चौकशीचे आदेश दिले आहेत आणि सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे.जगदीप धनखड यांच्या नोटांचे बंडल सापडल्याच्या खुलाशानंतर सभागृहात जोरदार गोंधळ झाला. या मुद्द्यावरून विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षांमध्ये जोरदार वाद पेटला. काही सदस्यांनी या घटनेच्या चौकशीची मागणी केली तर काहींनी हे एक राजकीय षडयंत्र असल्याचे म्हटले.

**अवकाळीचे पंचनामे करून**

फळबागांचे नुकसान झाले आहे तसेच होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने अवकाळी पाऊस हे कारण नियमोचीत दाखवून झालेल्या नुकसानीची तक्रार क्रॉप इन्शुरन्स पवर करण्यासाठी तलाठी व संबंधित यंत्रणेच्या मार्फत शेतकर्यांना कळवावे. तसेच प्रशासनाने घटनास्थळी जाऊन पंचनामे करावेत आणि शेतकरी बांधवांना सरसकट नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे केली आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक व तहसिलदार बीड आणि शिरूर का. यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

**बोधिसत्व फाउंडेशनच्या**

उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन बोधिसत्व फाउंडेशनचे सदस्य दयासागर जावळे,आनंद वाघमारे,प्रा. बाबासाहेब जावळे,जयदीप जावळे,अजय जावळे,सागर मोहन जावळे,आशिष जावळे,जयपाल जावळे,दत्ता जावळे,आकाश बंडू जावळे,रत्नादिप जावळे,सतिश उर्फ वालंगा जावळे,धम्मादीप जावळे,प्रमोद जावळे,प्रेमल जावळे,मेघराज कोकाटे,पंकज जावळे,भागवत जावळे,सिद्धोधन जावळे,मुक्ताराम जावळे,विशाल बाबासाहेब वाघमारे,ॲड. विजय विठ्ठल जावळे,स्वाती जावळे–वाघमारे यांनी केले.जि.प.के.प्रा.शाळा देवळा तसेच कदम वस्ती शाळेत याठिकाणी एक वही एक पेन हा आगळावेगळा उपक्रम राबवून बाबासाहेबांना आदरांजली वाहण्यात आली.

**महाराष्ट्र दुष्काळमुक्तीसाठी**

अनेक चालवायच्या आहेत. पण माझा भर हा नदीजोड प्रकल्पांवर असणार आहे. कारण मी जलसंपदा मंत्री असताना चार नदीजोड प्रकल्पांना मान्यता दिली आहे. हे प्रकल्प महाराष्ट्राला कायम दुष्काळातून मुक्त करू शकतात. त्यामुळे या प्रकल्पांवर माझा भर राहणार आहेपुढे बोलताना फडणवीस म्हणाले की, ग्रीन एनर्जीवर माझा भर राहणार आहे. मागच्या काळात ५४ हजार मेगावॅटचे वेगवेगळे प्रोजेक्ट हातात घेतले आहेत. यामुळे २०२३ साली महाराष्ट्रातील ५२ टक्के वीज अपारंपारिक स्त्रोतातील म्हणजे ग्रीन एनर्जी असणार आहे. याचा फायदा शेती आणि उद्योग या दोन क्षेत्रांना याचा फायदा होणार आहे. यांना फायदा झाला तर महाराष्ट्रात रोजगार निर्मिती होईल आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला देखील चालना मिळेल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणालेमुंबईसाठीच्या योजनांबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले की, २०१६ साली मोदींच्या नेतृत्वात घोषणा केली होती की मुंबईच्या एमएमआर भागातील कोणत्याही भागातून कोणत्याही भागात जाण्यासाठी एक तासापेक्षा कमी वेळ लागला पाहिजे. त्याच्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. कोस्टल रोड झाला पुढे बांद्रा–वरळी सी लिंक आहे. त्यापुढे बांद्रा–वर्सोवा सी लिंकचे काम सुरू आहे. वर्सोवा–मढचं काम सुरू होतंय. मढ पासून विरारपर्यंत सी लिंक तयार करायची आहे. जपानच्या सरकारने त्यासाठी ४० हजार कोटी देण्याचे कबूल केले आहे. यामुळे मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल.मुंबईथ ३७५ किलोमिटरचं मेट्रो नेटवर्क आपण तयार करत आहोत. सगळी काम होतील तेव्हा मुंबईकरांना दिवसातील तीन तास जास्त मिळतील असेही त्यांनी सांगितले

## पान सहा वरून

**आदित्य महाविद्यालयाने**...दोनदा जिल्ह्यातील शाळेत जाऊन त्या ठिकाणी विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून कॅरीज फ्री बीड बनवण्याचा संकल्प डॉ.अदितीजी सारडा व डॉ. अशोक जी थोरात यांनी या केला. कार्यक्रमात शाळेच्या वतीने चौधरी सर व आदित्य दंत महाविद्यालयाच्या वतीने डॉ, हिमांशुजी श्रीवास्तव, डॉ. मंगेश अंधारे यांनी व जिल्हा रुग्णालयाच्या वतीने डॉ. सत्येंद्र दबाडगावकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. आभार राम गायकवाड मानले.

**नेकनूर मूकबधिर शाळेत**...करावा लागला आहे. पण त्यांनी केलेल्या त्यागाची व संघर्षाची आपल्यालाही जाणीव असणे आवश्यक आहे. असे वक्तव्य श्रीमती खराटे मॅडम यांनी आपल्या मनोगत मधून व्यक्त केले आणि त्यानी व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजून सांगितले. प्रस्ताविक श्री गिराम सर यांनी केले ,.सूत्रसंचालन श्रीमती खरंगुळे मॅडम यांनी केले, कार्यक्रमाचे आभार श्री कुलकर्णी सर यांनी मानले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या साह्याने हा महापरिनिर्वाण दिन मूकबधिर शाळेत उत्साहात संपन्न झाला.

**औष्णिक विद्युत केंद्रात**...अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना वंदन करण्यात आले. त्यानंतर सामुदायिक त्रिशरण, पंचशीला ग्रहण करण्यात आली. यावेळी या कार्यक्रमात प्रभारी उपमुख्य अभियंता एच के अवचार, कार्यकारी अभियंता सेवा माटे मॅडम, अतिरिक्त कार्यकारी अभियंता निकील मेश्राम,अतिरिक्त कार्यकारी अभियंता अब्दुल नईम,सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड, राष्ट्रीय वीज पतसंस्थेचे चेअरमन बालाजी गित्ते, मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष बी एल वडमारे, व्यवस्थापक रमण मिठके, संचालक अनंत रोडे, संदीप पाटील, श्रीकृष्ण चाटे, विजय कांबळे, कांताबाई कांबळे, निर्मला शिरसाट यांच्यासह अधिकारी कर्मचारी वसाहतीतील नागरिक उपस्थित होते.

**परळीत डॉक्टरकीला कुकर्माची**

मुलालाही मारहाण केली. जीवे मारण्याची धमकी दिली.या फिर्यादीवरून तीन जणांविरुद्ध परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ ७४, भारतीय न्याय संहिता (थी एन एस), २०२३ ११५(२), भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ ३५२,भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ ३५१(२),भारतीय न्याय सहिता (बी एन एस), २०२३ ३५१(३) भारतीय न्याय सहिता (बी एन एस), २०२३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सपोनि अनिल शिंदे हे करीत आहेत.

**महायुती सरकारचा**

अतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य प्रशांत देशमुख, चेअरमन नागेश कर्डीले, नितीन गायकवाड, वेदांत देशमुख, राजू शिंदे, कदम, महेश पवळ, रोहन देशमुख, सुबोध दळवी, बाळू पवळ, विकास धर्माधिकारी इत्यादी महायुती समर्थक कार्यकर्ते आनंदोत्सावात सहभागी झाले होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी



## भटक्या कुत्र्यांची वाढली दहशत

**डोंबिवली :** भटक्या कुत्र्यांना ठार मारण्यासाठी मनाई आहे, तसेच त्यांचे स्थलांतरही करता येणार नाही. त्यामुळे त्यांचं निर्बीजीकरण करणे हा एकमेव पर्याय आहे. परंतु निर्बीजीकरणासाठी (नसबंदी) कोट्यवधी रुपये खर्च करूनही केडीएमसी परिक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांची संख्या मात्र वाढत आहे. गेल्या दहा महिन्यांत १८ हजारांवर चावा घेतल्याने कडोंमपा क्षेत्रातील कुत्र्यांची दहशत काही संपत नाही. शहरात झोपडपट्टी परिसरात भटके कुत्रे दिसून यायचे परंतु आता सगळीकडे त्यांची दहशत निर्माण झाली आहे. पदचात्र्यांच्या अंगावर धावून जाणे, चावा घेणे, रात्री अपरात्री जोरजोरात भुंकणे हे प्रकार सर्रास घडत आहेत. यातील काही घटनांमध्ये दुचाकीवरून जात असल्याच्या अंगावर धावून जाणे किंवा भुंकणे त्यामुळे दुचाकीवरून जाणाऱ्यांचा तोल जाऊन अपघात होतो.

**वेचक**

## मीरा गाव मेट्रो स्थानकाजवळ दुर्घटना

**भाईंदर :** मेट्रो मार्ग क्र.९ वरील मीरा गाव मेट्रो स्थानकाजवळ रस्ता खचल्यामुळे झालेल्या खड्यात एक मिक्सर पडून मिक्सरचा चालक मिक्सर खाली चिरडला जाऊन त्याचा मृत्यू झाला आहे, तर दोन क्लिनर जखमी झाले आहेत. मीरा भाईंदर मुंबई शहराला जोडण्यासाठी दहिसर



ते भाईंदर मेट्रो मार्ग क्र.९ ला शासनाने मंजुरी देऊन ९ सप्टेंबर २०१९ ला मेट्रोचे काम सुरू झाले होते. ते तीन वर्षांच्या कालावधीत पूर्ण होणार होते. परंतु अजूनही पुर्ण झालेले नाही. बुधवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास मीरा गाव मेट्रो स्थानकाजवळ रस्ता खचल्यामुळे झालेल्या साधारण २० फूट खोल खड्ड्यात मिक्सर कोसळला आणि त्याखाली आलेला चालक गंभीर जखमी झाला आणि उपचार दरम्यान गुरुवारी पहाटे त्याचा मृत्यू झाला. तर अन्य दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान महापालिकेच्या अग्निशमनदलाने क्रेनच्या सहाय्याने सिमेंटचा मिक्सर खड्ड्यातून बाहेर काढला. मीरा गाव मेट्रो रेल्वे स्थानकाचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरू असून दुर्घटनेच्या जवळच एक शाळा आणि मक्का हाऊस नावाने मस्जिद आहे. योग्य ती सुरक्षा व्यवस्था नसल्याने याच ठिकाणी काही दिवसपूर्वी १ रिक्षा आणि ३ दुचाकीचा अपघात झाला होता. परिसरातील नागरिकांनी याबाबत काशीमीरा पोलिस ठाण्यात तसेच एमएमआरडी विभागाकडे तक्रार केली होती. परंतु काही उपाययोजना झाल्या नसल्याची माहिती नागरिकांनी दिली. काशीमीरा पोलिस अधिक तपास करत आहे.

# 'अनधिकृत फलक हटवण्याची मोहीम दररोज राबवा'

### महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**



ठाणे महापालिका क्षेत्रात अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स हटवण्याची मोहीम दररोज राबवण्याचे आदेश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व सहाय्यक आयुक्तांना दिले आहेत. त्याचबरोबर, नोटीसा देणे, दंड वसुली आणि गुन्हा दाखल करणे याचा सहाय्यक आयुक्तांनी दैनंदिन आढावा घ्यावा, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले आहे.

महापालिका क्षेत्राचे विद्रुपीकरण थांबवण्यासाठी दैनंदिन मोहीम राबवून अनधिकृत फलक हटवण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत, मा. उच्च न्यायालयाचे अतिशय काटेकोर आदेश आहेत. त्याचे पालन सगळ्यांनी करावे. अनधिकृत पोस्टर, बॅनर, फलक लावला की त्यावर नोटीस, दंड आकारणी आणि गुन्हे दाखल करणे ही कारवाई अतिशय प्रभावीपणे करण्यात यावी, असे आयुक्त राव म्हणाले.

ठाणे महापालिकेच्या नागरी संशोधन केंद्र येथे आयुक्त सौरभ राव यांनी बुधवारी सायंकाळी सर्व उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख, कार्यकारी अभियंता यांची आढावा बैठक घेतली. त्यास, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा उपस्थित होते. उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे यांनी यावेळी विविध विभागांकडील कामांचा आढावा घेणारे सादरीकरण केले.

दरवर्षी पावसाळ्याच्या आगमनापूर्वी केल्या जाणाऱ्या वृक्ष छाटणीबाबत तक्रारी येतात. त्यामुळे आयुक्त राव यांनी ही वृक्ष छाटणी दोन टप्प्यात करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, उद्यान विभागाने नियोजन केले आहे. जानेवारी महिन्यापासून झाडांच्या वाढलेल्या आणि धोकादायक स्थितीतील फांद्या, धोकादायक वृक्ष यांची पाहणी करून त्यांच्या छाटणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. हे काम वेळेत सुरू करण्याची सूचना आयुक्त राव यांनी बैठकीत दिली.

ठाणे महापालिका क्षेत्रात, सन २०२४ च्या गणेशोत्सवात सुमारे ३० टक्के मूर्ती या शाडूच्या होत्या. हे प्रमाण पुढील वर्षी वाढवण्यासाठी पर्यावरण विभागाने सहा महिन्यांचा कालबद्ध कार्यक्रम हाती घ्यावा, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत.

सन २०२५ च्या गणेशोत्सवात ठाणेकरांचा शाडूच्या मूर्तींकडील कल वाढावा यासाठी त्या मूर्ती किफायतशीर कशा होतील, यासाठी प्रयत्न करावेत. मूर्तीकार, गणेश मंडळे, पर्यावरण विषयातील संस्था यांच्या मदतीने याबाबत जनजागृती करण्यात यावी. मूर्तीकारांशी संवाद साधून त्यांना शाडूची माती आणि कार्यशाळेसाठी जागा आगाऊ उपलब्ध करून द्यावी, असेही आयुक्तांनी सांगितले.

रस्तोरस्ती लागणाऱ्या मूर्ती विक्री केंद्रांऐवजी केंद्रीत पध्दतीने, ठिकठिकाणच्या मोकळ्या जागांमध्ये, मैदानात स्टॉलची व्यवस्था करावी, म्हणजे रस्ते वाहतूक आणि पादचाऱ्यांना अडथळा येणार नाही, याची दक्षता सहाय्यक आयुक्तांनी आपापल्या प्रभागात घ्यावी, असे आयुक्त म्हणाले.

### अनेक जणांवर गुन्हा दाखल

# कल्याणमध्ये इराणी वस्तीत पोलिसांवर हल्ला

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**



वॉन्टेड आरोपी ओनु लाल इराणी याच्या अटके दरम्यान पोलिसांवर हल्ला झाल्याची घटना आंबिवलीतील इराणी वस्ती परिसरात उघडकीस आली. ही घटना आंबिवली रेल्वे स्थानकावर घडली. बुधवारी रात्री दहाच्या सुमारास मुंबई, अंधेरी, एमआयडीसी येथून १० ते १५ पोलिसांचे पथक वॉन्टेड आरोपीला पकडण्यासाठी आले असता, पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. नंतर मुंबईला रवाना झाल्याची माहिती आरोपीच्या कुटुंबीयांना आणि स्थानिक लोकांना कळली आणि त्यांचा मोठा जमाव स्टेशनवर पोहोचला. या लोकांनी पोलिसांवर हल्ला करत दगडफेक सुरू केली. अचानक झालेल्या या हल्ल्यात तीन पोलीस जखमी झाले. या घटनेनंतर स्थानकात गोंधळ उडाला आणि पोलिसांनी तात्काळ अतिरिक्त फौजफाट्यांना मदतीसाठी पाचारण केले.

पोलिसांवर दगडफेक करणाऱ्या २५ जणांवर विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करत चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर दगडफेक करणाऱ्या उर्वरित लोकांचा खडकपाडा पोलिसांकडून कसून शोध घेण्यात येत असल्याची माहिती कल्याणचे डीसीपी अतुल झेंडे यांनी दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आंबिवली परिसरात कडक बंदोबस्त ठेवला असून घटनेचा कसून तपास सुरू केला आहे. झोन ४ च्या टीमने रात्रभर कारवाई केली आणि पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत ३६ हून अधिक जणांवर गुन्हा दाखल केला.

यातील पाच आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये चार महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे. फातिमा इराणी, नादिरा इराणी, कुर मोस्मी खान, मोस्मी इराणी आणि आणखी एक व्यक्ती अशी अटक आरोपींची नावे आहेत. या सर्वांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमरनाथ वाघमोडे यांनी सांगितले की, अटक करण्यात आलेल्या आरोपींवर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. या घटनेत सहभागी असलेल्या इतर लोकांचा शोध सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींवर कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## फळ विक्रेत्याच्या घरातून चार लाखांची चोरी

**कल्याण :** कल्याणच्या गोविंदवाडी संकुलात राहणाऱ्या एका फळ विक्रेत्याच्या घरातील तिजोरीचा दरवाजा आणि लॉकर तोडून चोरट्यांनी चार लाख रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. बाजारपेठ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोविंदवाडी, गुजराती मंदिराजवळ राहणारे फळ विक्रेते गुलाम अली शेख हे दोन दिवसांपासून कुठेतरी बाहेर गेले होते. यावेळी अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचा तिजोरीचा दरवाजा व लॉकर तोडून तिजोरीत ठेवलेली ३ लाख ९२ हजार रुपयांची रोकड चोरून नेली.

घरी परतल्यानंतर गुलाम अली शेख यांना चोरीची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी कल्याणच्या बाजारपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# 'सहानुभूती नव्हे, तर दिव्यांग विद्यार्थ्यांना विश्वासाची गरज'

### नाकोडा कर्णबधिर विद्यालय येथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त भैरव सेवा समिती, भिवंडीद्वारा संचालित नाकोडा कर्णबधिर विद्यालय, सरवली येथे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी भेट दिली.

याप्रसंगी कर्णबधिर दिव्यांग विद्यार्थी यांना शिक्षणासोबत व्यावसायिक शिक्षण, प्रशिक्षण व पुर्नवसनाची गरज आहे. भैरव सेवा समिती, भिवंडीचे संस्थापक स्व. राजमलजी जैन यांच्या कार्याची प्रशंसा केली तसेच ठाणे जिल्ह्यातील एकूण ४ हजार शाळांमध्ये नाकोडा कर्णबधिर शाळा ही इतर सर्व शाळांसाठी आदर्श मॉडेल म्हणून कार्यरत आहे, अशा शब्दात शाळेचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना मुख्य




कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी शुभेच्छा दिल्या.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित केलेल्या आंतरशालेय विविध स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या विजेत्या विद्यार्थ्यांचे बक्षिस वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच शाळेच्या कर्णबधिर विद्यार्थ्यांनी उपस्थित सर्वासमोर मल्लखांबचे प्रात्यक्षिक सादर केले.

या शाळेत एकूण २११ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत या शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात असून 'सहानुभूती नव्हे तर दिव्यांग विद्यार्थ्यांना विश्वासाची गरज आहे, संधी देण्याची आवश्यकता आहे. दिव्यांग हे देशाच्या प्रगतीचे अविभाज्य घटक आहेत, असे मार्गदर्शन जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्ज्वला सपकाळे यांनी केले.

# खरेदी केंद्राअभावी आदिवासी शेतकऱ्यांची गळचेपी



**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी साठवलेला भात मुरबाड तालुका खरेदी विक्री संघाने केंद्र शासनाच्या हमी भावाने खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. तसेच मुरबाड खरेदी विक्री संघाच्या वतीने शेतकऱ्यांना टोकन वाटप करण्यात आले आहे. दोन ते तीन दिवसापासून ऑनलाईन भात खरेदीची नोंदणीही सुरू झालेली आहे. मात्र आदिवासी विभागातील हमी भावाने भात खरेदी करण्याची कोणतीही प्रक्रिया अजून सुरु झाली नसल्याने आदिवासी भागातील शेतकरी मोठ्या विवंचनेत आहे. वर्षभर मेहनत करून पिकवलेला भात नाईलाजाने खाजगी व्यापाऱ्यांना द्यावा लागेल. व्यापारी सुद्धा याच संधीची वाट पाहत आहेत. हे खाजगी व्यापारी शेतकऱ्यांच्या अडचणीचा फायदा उठवत कमी भावाने भात खरेदी करून गरिब शेतकऱ्यांची लुट करतात. असे होऊ नये म्हणून खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन प्रकाश पवार यांनी आदिवासी विकास महामंडळ उपप्रादेशिक कार्यालय शहापूर यांना पत्र लिहून मुरबाड तालुक्यातील धसई, दुधनोळी, टोकावडे, माळ, शिरोशी, न्याहाडी या आदिवासी विभागातील भात खरेदी केंद्र तात्काळ सुरु करण्याची मागणी केली आहे.

# 'घणसोली गावातील साई सदानंद नगरचा पुनर्विकास करा'

### सामाजिक कार्यकर्ते संतोष नाईक यांची मागणी

◆ **घणसोली (वार्ताहर) :**

घणसोली गावातील साई सदानंद नगरमध्ये चाळी आहेत. या चाळींमध्ये पावसाळ्यात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. उन्हाळ्यात देखील याठिकाणी विविध नागरी समस्या उद्भवतात. त्यामुळे या नगराचा पुनर्विकास केल्यास सबंधित प्रशासनाला देखील आर्थिक फायदा होईल म्हणून या साई सदानंद नगराचा पुनर्विकास करून मुख्य प्रवाहात आणण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते संतोष नाईक यांनी सिडकोकडे केली आहे.

घणसोली गावाच्या प्रवेश द्वारावर साई सदानंद नगर २००० सालाच्या अगोदर पासून बसले आहे. साधारणतः २०१५ पर्यंत या ठिकाणी असलेल्या चाळीकरांना नागरी समस्येला सामोरे जावे लागत नव्हते. परंतु त्यानंतर या नगराच्या तीनही बाजूला अवैध बांधकामे झाली. त्यामुळे या ठिकाणी नागरी समस्यांचा उद्रेक मोठ्या प्रमाणात झाला. आजही नेहमीच या ठिकाणी नागरी समस्या उद्भवत असल्याचे सांगण्यात येत आहे.

साई सदानंद नगरच्या तीनही बाजूला अवैध बांधकामे झाल्याने

> याविषयी सबंधित विभागाला कळविले जाईल. त्यानंतर ते पुढील निर्णय घेतील.
> – **प्रिया रातांबे,** जनसंपर्क अधिकारी, सिडको.

नागरिक समस्या वाढल्या. साधारणतः सात ते आठ वर्षांपूर्वी या परिसरात अंतर्गत पाय वाटेचे रूपांतर काँक्रीटीकरण मध्ये करण्यात आले. तसेच काँक्रीटीकरण करताना स्थापत्य नियमांचे उल्लंघन झाल्याने आता पावसाळ्याचे पाणी थेट घरात घुसत असल्याने येथील रहिवासीयांना रात्रभर पाणी काढावे लागत आहे. यामुळे येथील नागरिक त्रासले असल्याचे नाईक यांचे म्हणणे आहे.

या नगरात शंभरपेक्षा जास्त घरे आहेत. या ठिकाणी राहत असलेल्या सर्वसामान्य गरीब, गरजू रहिवशांना किमान एक वन बी एचके घर दिले तर त्यांना त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले असे वाटेल. बाकी उरलेली घरे जरी संबंधित प्रशासनाने विकली तर त्या प्रशासनाला कोट्यवधी रुपयांचा फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शैक्षणिक समस्या सोडविण्याकरिता आ. म्हात्रे यांचा पुढाकार

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी) :**

राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर बांधवांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्याकरिता कोकण विभागाचे शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे व माजी आ. श्रीकांत देशपांडे यांनी शिक्षण संचालक कार्यालय पुणे येथे भेट देऊन शिक्षण सहसंचालक पानझडे यांची भेट घेऊन राज्यातील शिक्षकांच्या असलेल्या शैक्षणिक समस्यांबाबत चर्चा केली. दरम्यान आजी व माजी आमदारांनी सूचना केल्या. त्यामध्ये अघोषित शाळांची यादी पुढील १० दिवसात जाहिर करा, तसेच २०२४/२५ या शैक्षणिक वर्षाची संच मान्यतेचे काम सुरू करा, वाढीव टप्पा अनुदानाची व त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांची माहिती शिक्षणाधिकारी यांच्याकडून मागितली आहे. ती मंजूर करून अनुदान मंजूर करा, विना अनुदानावरून १०० टक्के अनुदानावर बदलीचे प्रस्ताव तात्काळ राज्य शासनास सादर करण्याच्या सूचना दिल्या. तसेच उच्च माध्यमिक वाढीव पदावरील उरलेल्या शिक्षकांची माहिती शासनास सादर करण्याबाबत सूचना दिल्या. अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर समायोजनाबाबत येणाऱ्या



अडचणी सोडवून मग समायोजन करण्याच्या सूचना केल्या. तसेच टप्प्यावरील शिक्षकांचे समायोजन सुद्धा करण्यासाठी कार्यवाही करावी. संच मान्यता दुरुस्ती तात्काळ कराव्यात. तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांना रजा कालावधी टॅब उपलब्ध करून देण्यात यावा. अशा अनेक विषयावर सकारात्मक चर्चा केली व राज्यातील आलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर बांधवांचे प्रश्न मांडून ते सोडवण्यात आले.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त तरुणांनी काढली बाईक रॅली

◆ **शहापूर (वार्ताहर) :**

भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर येथील मिलिंद महाविद्यालयाच्या प्राचार्या व विविध विषयाचे प्राध्यापक यांनी चैत्यभूमीपर्यंत काढलेल्या अभिवादन बाईक रॅलीचे शहापुरात प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे यांनी स्वागत केले. तरुण पिढीमध्ये इतिहास जागृत ठेवण्यासाठी तसेच समाज संघटित करणे हा उद्देश समोर ठेऊन अभिवादन बाईक रॅली काढण्यात आली



असल्याचे मिलिंद महाविद्यालयाच्या प्राचार्या वैशाली प्रधान यांनी स्पष्ट केले.

या रॅलीमध्ये भन्ते डॉ. एम.सत्यपाल यांसह मिलिंद महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सूरज बन्सी तसेच विविध विषयांचे प्राध्यापक व काही विद्यार्थी असे ५० जण या अभिवादन बाईक रॅलीमध्ये सहभागी झाले होते. शहापुरच्या आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी डी. डी. काळपांडे, पवन पाटील यांनी या अभिवादन रॅलीचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# 'वेळेत न येणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करा'

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

कल्याण-डोंबिवली पालिकेच्या शाळांमधील नियमित वेळेत न येणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करण्यात यावी. समज देऊनही शिक्षक वेळेत शाळेत येत नसेल तर अशा शिक्षकांना निलंबित करा, असे आदेश कल्याण डोंबिवली पालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी पालिका शिक्षण विभागाच्या उपायुक्तांना दिले. पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी कल्याणमधील धाकटे शहाड,



घोलपनगर भागातील मिलिंदनगर, बारावे येथील कल्याण डोंबिवली पालिकेच्या मराठी शाळांना भेटी दिल्या. या भेटीच्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या वर्ग खोल्यांची स्थिती, शाळेची इमारत, शाळेतील भौतिक सुविधा, शाळा परिसरातील पटांगण, खेळ साहित्य सुविधांची पाहणी केली. विद्यार्थ्यांचा क्रमिक अभ्यासक्रम विहित वेळेत पूर्ण झाला पाहिजे. यासंदर्भात मुख्याध्यापक, शिक्षकांनी तत्पर असले पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देता येईल यादृष्टीने शिक्षकांनी प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी शाळाप्रमुख, शिक्षकांना केल्या. शाळेत नियमित वेळेत न येणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करण्याच्या, प्रसंगी त्या शिक्षकाला निलंबित करा. विनापरवानगी असे आदेश आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी दिले.

# मलावी हापूसच्या उत्पादनात घट

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी):**

वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत नोव्हेंबर अखेरीस परदेशी मलावी हापूस दाखल होतो. दिवसेंदिवस याची मागणी वाढत आहे. मात्र यंदा बाजारात एक दिवस आड करून मलावी हापूस दाखल होत आहे. मलावी हापूसचे उत्पादन अवघे ५० टक्के असणार आहे, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली. हापूस म्हटला की रत्नागिरी, देवगड हापूसची गोडी डोळ्यासमोर येते. देवगडचा हापूस अवीट गोडीसाठी प्रसिद्ध आहे. कोकणातील हापूस आंब्याप्रमाणेच या मलावी हापूस आंब्याची चव, रंग, सुगंध असल्याने खवय्यांना सुवर्णसंधी आहे. मलावी मधील ६०० हेक्टर जमिनीवर या हापूस आंब्याची लागवड करण्यात आली आहे. १३ वर्षांपूर्वी रत्नागिरीमधून ४० हजार हापूस आंब्याच्या काड्या मलावी मध्ये नेल्या होत्या. मलावी मधील हवामान कोकणातील हवामानासारखेच उष्ण दमट असल्याने तिथे लागवड केलेल्या आंब्याला फळधारणा चांगली



होते. त्यामुळे ग्राहक देशी हापूस इतकेच परदेशी हापूसला पसंती देत आहेत. एपीएमसी बाजारात फेब्रुवारीमध्ये देशी हापूसचा हंगाम सुरू होतो. मात्र तत्पूर्वी बाजारात नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये आफ्रिकन मलावी हापूस दाखल होतो.

यंदा बाजारात डिसेंबरअखेर पर्यंत मलावी हापूस हंगाम असणार आहे, अशी माहिती फळ बाजार संचालक संजय पानसरे यांनी दिली आहे.

## डोंबिवलीत भाजपा कार्यकर्त्यांचा उत्साह

**कल्याण :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी



मुख्यमंत्रीपदाची गुरुवारी शपथ घेतली. महायुतीच्या कार्यकर्त्यांसाठी हा आनंद सोहळा असून या आनंद सोहळ्यात सहभागी होण्यासाठी डोंबिवलीकर नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या नागरिकांना शपथविधी सोहळा पर्यंत नेण्यासाठी डोंबिवलीसह कल्याणच्या ग्रामीण भागातून तब्बल २०० बसेसची सोय करण्यात आली होती.

**प्रदूषण टाळण्यासाठी पीओपीचा वापर टाळा**

# 'शाडूच्या मूर्ती बनविण्याच्या केडीएमसीच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा'

◆ **कल्याण (वार्ताहर) :**

पर्यावरण पूरक म्हणजेच शाडूच्या गणेश मूर्ती बनविण्याबाबत कल्याण-डोंबिवली महापालिकेने केलेल्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे प्रतिपादन पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील यांनी केले. फेब्रुवारीमध्ये असणाऱ्या माघी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिका कार्यक्षेत्रातील कारखानदार, मूर्ती विक्रेते, मूर्तिकार यांच्यासमवेत महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात संपन्न झालेल्या बैठकीत बोलताना त्यांनी



हे प्रतिपादन केले.

पीओपीच्या मूर्ती पाण्यामध्ये विरघळत नाहीत, परिणामी जलस्त्रोतातील प्रदूषणात वाढ होवून पर्यावरणाचे संतुलन बिघडते. त्यामुळे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, दिल्ली यांच्याकडील (दि. १२ मे २०२०) च्या सुधारीत मार्गदर्शक तत्वानुसार नदी, खाडीचे प्रदूषण व नुकसान टाळण्यासाठी केंद्र सरकारने पीओपीच्या मूर्तीवर बंदी जाहीर केली आहे. या अनुषंगाने महापालिका क्षेत्रामध्ये पीओपीच्या वापरावर (मूर्ती बनविणे) बंदी घालण्यासंदर्भात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे, पर्यावरण दक्षता मंडळाच्या रुपाली शाईवाले, पुनरावर्तन संस्थेच्या मयुरी कुंभार, मनुश्रृष्टी पर्यावरण समंत्रक वैशाली तांबट आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

कल्याण हे प्रामुख्याने रेसिडेन्सीयल हब आहे. मुंबईत दररोज जाणारे असंख्य चाकरमानी कल्याण मध्ये राहतात, त्यामुळे येथील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पीओपीच्या मूर्ती बनविण्यावर पूर्णपणे बंदी घालावी, असे आवाहन पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील यांनी या बैठकीत केले.

महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार शाडू मातीच्या मूर्ती बनविण्यासाठी मूर्तिकारांना जागा व माती महापालिकेमार्फत विनामुल्य उपलब्ध दिली जाईल. सप्टेंबर २०२४ पर्यंत एकूण ७२ मूर्तीकारांना तसेच अनेक संस्थांना महापालिकेमार्फत ५० टन शाडू मातीचे विनामुल्य वाटप करण्यात आले आहे, अशी माहिती पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे यांनी दिली.

पुनरावर्तन संस्थेच्या मयुरी कुंभार तसेच पर्यावरण दक्षता मंडळाच्या रुपाली शाईवाले यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच मनुश्रृष्टि पर्यावरण समंत्रक वैशाली तांबट यांनी सिपीसीबी गाईड लाईन्स , उच्च न्यायालयाच्या मनाईनुसार पीओपी बंदी, वायुप्रदूषण व जलप्रदूषण, बाबत सविस्तर माहितीवजा प्रेझेंटेशन सादर करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. बैठकीत उपस्थित असलेल्या मूर्तिकारांनी महापालिकेच्या या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला.

# मिठाई व्यापाऱ्यांनी घेतली अन्न प्रशासनाच्या आयुक्तांची भेट

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण शिव-भीम मिठाई मावा खवा व ट्रान्सपोर्ट चालक-मालक व्यापारी कामगार संघटनाच्या वतीने अन्न प्राशासन कोंकण विभागीय नव नियुक्त सह आयुक्त श्रीकांत करकाळे यांनी पदभार स्वीकारल्याने त्यांचे स्वागत करण्यात आले. तेव्हा संघटना सचिव जयदीप सानप यांनी त्यांना भारतीय संविधान प्रत भेट दिली.

तर अध्यक्ष सागर पागरे यांनी शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार केला. संघटना संस्थापक शिवसेना कल्याण मुरबाड जिल्हा प्रमुख अरविंद मोरे हे बाहेर गावी असल्याने त्यांनी फोनकरून शुभेच्छा दिल्या. यावेळी संघटना व्यापारी यांना व्यवसाय करताना येणाऱ्या समस्यांबाबत सचिव जयदीप सानप यांनी लेखी व तोंडी निवेदन दिले. कारवाई दरम्यान जप्त केलेले नमूने अहवाल लवकरात लवकर मिळावे. कोल्डस्टोर खर्चाबाबत ठोस निर्णय घ्यावा. जप्त असलेला साठा नमुना अहवाल त्वरित मिळावा जेणे करुन खर्च कमी येतो साठा अपात्र असल्यास त्वरित नष्ट व इतर करवाई त्वरित व्हावी. आदी विषयांवर संघटनेच्या वतीने लेखी व तोंडी निवेदन देण्यात आले.

**सुविचार-** चांगलं आयुष्य मागून मिळत नाही, त्यासाठी मेहनत करावी लागते.

# नसती ओढाताण...!

एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पक्षाला देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारमध्ये सहभागी होणे अपरिहार्य आहे हे अगदी निवडणुकीचे निकाल लागले त्या दिवशीपासूनच स्पष्ट झाले होते. अजित पवारांनी तर लगेच तडजोड मान्य करीत उपमुख्यमंत्री म्हणून आपण समाधानी असल्याचे सांगितले. खात्यासंबंधीच्या वाटाघाटी नंतर होतीलच; परंतु उपमुख्यमंत्री म्हणून आपण शपथ घेणार ही त्यांची अगदी सुरुवातीपासून भूमिका राहिली आहे. खरे तर मुख्यमंत्री पदासाठी सर्वाधिक आसुसलेले नेते सध्या अजित पवारच आहेत; परंतु राजकारणातील वास्तवाचे भान त्यांना आहे आणि म्हणूनच निवडणुकीआधीदेखील त्यांनी मुख्यमंत्री पदासाठी संख्याबळ पाठीशी असावे लागते असे सांगत इतक्या कमी आमदारांच्या पाठिंब्यावर आपण मुख्यमंत्री पदाचे स्वप्न पाहू शकत नाही असे स्पष्ट केले होते. निवडणुकीनंतरही त्यांनी फारशी खळखळ न करता किंवा कुठलेही आढेवेढे न घेता मुख्यमंत्री पदासाठी फडणवीस यांना आपला पाठिंबा घोषित केला. परिस्थिती थोडी वेगळी असती आणि अजित पवारांच्या समर्थनाशिवाय सरकार स्थापन होणार नाही अशी काहीशी स्थिती असती तर मात्र अजित पवारांनी मुख्यमंत्री पदासाठी शक्य तितके ताणून धरले असते; परंतु आकड्यांचा खेळ हा पूर्णपणे भाजपच्या बाजूने आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी राजकीय समंजसपणा दाखवला. असा समंजसपणा एकनाथ शिंदेंनाही दाखविता आला असता. त्यामुळे सरकार स्थापनेला जो काही विलंब झाला तो टाळता आला असता, शिवाय शिवसेना आणि भाजप यांच्यातील नातेदेखील अधिक एकजीव आणि खेळीमेळीचे राहिले असते. आता ते तसे नाही असे म्हणता येणार नसले तरी एकनाथ शिंदे यांनी आधी मुख्यमंत्रिपदावरून आणि नंतर गृहमंत्री पदावरून ताणून धरण्याची जी काही भूमिका घेतली त्यामुळे भाजपचे शीर्षस्थ नेते मनातून नक्कीच नाराज असतील. भाजपला विधानसभा निवडणुकीत १३२ इतक्या प्रचंड जागा मिळाल्यानंतर मुख्यमंत्री पदावर भाजपचा दावा असेल हे स्पष्ट होते तरीदेखील सुरुवातीचे काही दिवस मी जनतेच्या मनातला मुख्यमंत्री वगैरे भाषा शिंदे यांच्या तोंडी होती. मुख्यमंत्रिपद आपल्याकडेच राहावे यासाठी त्यांनी पडद्याआडून थोडेफार प्रयत्न नक्कीच केले; परंतु भाजप श्रेष्ठींनी खमकी भूमिका घेत शिंदेंना माघार घेण्यास भाग पाडले. मुख्यमंत्रिपद आपल्याला मिळणार नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी किमान गृहमंत्रालय तरी आपल्याला मिळावे यासाठी शिंदे यांनी दबावाचे राजकारण सुरू केले. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत चर्चेचे गुऱ्हाळ सुरूच होते. शेवटी नेमकी काय तडजोड झाली हे पुढील काही दिवसात स्पष्ट होणार असले तरी शपथविधी कार्यक्रम अगदी काही तासांवर येईपर्यंत एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार की नाही हे चित्र स्पष्ट झाले नव्हते. शिंदे यांची ही भूमिका थोडी अनाकलनीय म्हणावी लागेल. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संख्याबळ सरकार चालवण्यासाठी, पाच वर्ष टिकवून ठेवण्यासाठी पुरेसे आहे हे माहीत असूनही शिंदे यांनी इतकी ओढाताण का केली हे कळण्यास मार्ग नाही. शेवटी इतकी ओढाताण केल्यानंतरही त्यांच्या पदरी गृहमंत्रालय पडले नाही तर एकनाथ शिंदेंची प्रतिष्ठा बाधित होणार आहे. शिंदेंना मान्य असो अथवा नसो, त्यांना यापुढचे राजकारण भाजपचे बोट धरूनच करावे लागणार आहे आणि सद्यस्थितीत भाजपची ताकद राज्यात शिंदेंच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. भाजपला सोडून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणे, टिकवणे आणि वाढविणे एकनाथ शिंदेंसाठी खूप अवघड गोष्ट आहे. त्यामुळे भविष्यात उद्धव ठाकरे सारखे आपले हाल होऊ नयेत असे शिंदेंना वाटत असेल तर त्यांनी भाजपसोबत जुळवून घेण्यातच शहाणपणा आहे. अर्थात शिंदे यांनाही याची कल्पना नक्कीच असेल; परंतु त्यानंतरही त्यांनी भाजप नेत्यांना दुखाविण्याचे काम केले असेल तर प्रत्येक गोष्टीचा बारीक हिशोब ठेवणाऱ्या अमित शाहांनी याचीही दखल आपल्या डायरीत नक्कीच घेतली असावी. संजय राऊत यांच्या तर्काप्रमाणे शिंदे यांचे हे दबावाचे राजकारण भाजप श्रेष्ठींच्या इशाऱ्यानुसारच होत असेल तर हा सगळा भातुकलीचा खेळ ठरतो; परंतु तसे नसेल तर भविष्यात शिंदेंची चांगलीच कोंडी होऊ शकते.

# शिवसेना कुणाची....?

राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री म्हणून सामील होण्यास तयार नसतानाच सोशल मीडियावर उदय सामंत यांच्या नावाखाली एक वक्तव्य व्हायरल होत होते. अर्थात तो खोडसाळपणा होता हे नंतर स्पष्ट झाले असले तरी त्या खोडसाळपणात एका अशा गोष्टीचा उल्लेख होता की जी कदाचित उद्याची वस्तुस्थिती असू शकेल. सरकार बाहेर राहून पक्ष संघटन मजबूत करण्यावर भर देईल, अशी एकनाथ शिंदेंची सुरुवातीची भूमिका होती, त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी उद्या तुमचा पक्षच राहणार नाही तर कुठल्या पक्षाचे संघटन वाढवण्यासाठी मंत्रिमंडळाबाहेर राहता, असे सांगत त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, असे त्या खोडसाळ वक्तव्यात म्हटले होते. अर्थात असे कोणतेही वक्तव्य ना कधी फडणवीसांनी केले आणि ना उदय सामंत यांनी ते व्हायरल केले; परंतु या खोडसाळ वक्तव्यातून जी शक्यता वर्तविण्यात आली ती नक्कीच विचार करण्यासारखी आहे. भविष्यात शिवसेना या पक्षाचे खरे दावेदार किंवा वारसदार कोण याचा फैसला सर्वोच्च न्यायालयात होणार आहे. तिथे खरी शिवसेना उद्धव ठाकरेंचीच असा निकाल आला तर एकनाथ शिंदेंना शिवसेना हा पक्ष आणि धनुष्यबाण या पक्षाच्या चिन्हावर पाणी सोडावे लागेल. त्यानंतर एकनाथ शिंदेंना पक्षाच्या नव्या नावाचा प्रस्ताव निवडणूक आयोगाकडे पाठवावा लागेल. या नव्या नावात शिवसेना असेल याची दक्षता एकनाथ शिंदे नक्कीच घेतील आणि कदाचित या नव्या पक्षाचे नाव शिवसेना (बाळासाहेबांची) असे असू शकेल. त्या परिस्थितीत बाळासाहेबांची एक शिवसेना उद्धव ठाकरेंकडे तर दुसरी एकनाथ शिंदेंकडे असे काहीसे चित्र समोर येईल. तूर्तास तरी हे दोन्ही गट एकमेकांत विलिन होण्याची कोणतीही शक्यता नाही, भविष्यात काय होईल हे सांगता येत नाही; परंतु तोपर्यंत या दोन शिवसेनांची स्पर्धा अशीच सुरू राहील. उद्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीतही अशीच परिस्थिती उद्भवू शकते.

## लोकनामा

# धम्म कर्तव्य बजावेपर्यंत मृत्यूला टाळले..!



**भूपेंद्र गणवीर**
9834245768
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर



भारताच्या जडणघडणीला दिशा दिली, विकास आणि समृद्धीचा पाया रचला, एकता व अखंडतेत बांधून ठेवणारे संविधान दिले, एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य दिले, लोकशाही तत्त्वे दिली, तथागत बुद्धाचा भारत ही ओळख दिली, त्या महापुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आज स्मरण दिन. याच रात्री त्यांनी झोपेत जगाचा निरोप घेतला. त्यांच्या महानिर्वाणाने जगभरातील शोषित, वंचितांना अतीव दुःख झाले. त्यांच्या अश्रूंचे बांध फुटले. त्यांना अखेरचा निरोप देण्यास दिल्ली, मुंबईत जनसागर उसळला. लोकांचा विलाप होता. ते धाय मोकलून रडत होते. 'न भुतो न भविष्यति' अशी अंत्ययात्रा होती. समुद्राच्या काठावर पार्थिवावर अंत्यसंस्कार उरकले. दोन महासागर एक-दुसऱ्यात विलीन झाले. त्या स्थळाची ओळख चैत्यभूमी. तिथे दरवर्षी लाखोंची गर्दी उसळते. मृत्यूनंतरही इतके प्रेम ज्यांच्या वाटेला आले, असा या जगात बुद्ध- आंबेडकरांनंतर तिसरा कोणी नाही. असे क्षेत्र नाही जिथे त्यांचे योगदान नाही. इतिहास, शिक्षण, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, ऊर्जा, सिंचन, कायदे आदी... धार्मिक क्षेत्र शिल्लक होते, आयुष्याच्या अंतिम काळात तिथे योगदान दिले अन् ते समृद्ध केले. याप्रकारे आपला प्रण पूर्ण केला. त्यासाठी मला जगद्गुरू संत तुकाराम यांचा अभंग आठवतो. 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले.' याच कारणामुळे त्यांना वंदन करण्यास चैत्यभूमीच्या दिशेने असंख्य पाऊले चालताना दिसतात.

नाशिक जिल्ह्यातील येवला गाव. ऐतिहासिक सभेचा साक्षीदार. तिथी १३ ऑक्टोबर-१९३५. त्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'मी हिंदू धर्मात जन्माला आलो ते माझ्या हातात नव्हते. मात्र, मी हिंदू म्हणून मरणार नाही.' अशी घोषणा केली. तो धार्मिक वर्चस्वाचा काळ होता. तेव्हा केलेली घोषणा प्रत्येकाला अशक्य वाटली. तेव्हापासून ते कोणत्या धर्मात जाणार, यावर बरेच तर्कवितर्क झाले. वेगवेगळे अंदाज लावले. त्या सर्वांना चकमा दिला. घोषणेपासून तब्बल २१ वर्षे थांबले. धार्मिक सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला. त्यात अपयश आले तेव्हा निर्धार केला. एक, एक पाऊल त्या दिशेने टाकत गेले. ते 'बोले तैसा चाले', असे दृढनिश्चयी, निर्धारी होते. त्याची प्रचिती सातत्याने आली. संघर्षाने त्यांचा जन्मापासून पिच्छा सोडला नाही. मानव मुक्ती हे त्यांचे ध्येय होते. त्यासाठी ते विविध आघाड्यांवर लढत होते. यात हिंदू धर्म त्यागाचा विषय मागे पडला होता. दरम्यान त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक चळवळी उभारल्या. आर्थिक मजबुती देणाऱ्या विचारांची मांडणी केली. रिझर्व बँकेचा पाया रचला, बँक व्यवस्था दिली, देशाला संविधान दिले, आरक्षण दिले, समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्यायाची संकल्पना दिली. आयुष्याच्या या धकाधकीत त्यांची प्रकृती ढासळत गेली. डॉक्टरांनी त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला. त्याला त्यांनी जुमानले नाही. त्यांच्या पुढे दोन पर्याय होते. जीवन की कर्तव्य..! त्यांनी कर्तव्य निवडले अन् प्राणाची बाजी लावली. त्यांनी मनू व्यवस्थेवर आधारित भेदभाव करणारी मनुस्मृती जाळली. तिला पर्याय समतेवर आधारित घटना दिली. त्यांनी जाती, जमाती, ओबीसींना प्रगतीपासून रोखणाऱ्या, वर्णव्यवस्था पाळणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग केला. विज्ञाननिष्ठ, समतेवर आधारित बुद्ध धम्म दिला. त्यांनी समस्या मांडल्या आणि त्यांचे समाधान दिले. त्यामुळेच ते जगावेगळे महापुरुष ठरले.

ते मानव मुक्तीसाठी अहोरात्र झटले, जागले, कष्ट घेतले, लिखाण चालू ठेवले. व्यक्तीच्या विकासासाठी करुणा, समता, स्वातंत्र्य आवश्यक आहे. जाती व्यवस्थेमुळे हिंदू धर्मात या तिन्ही गोष्टींचा अभाव आहे, अशी त्यांना खात्री पटली. त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास केला. त्यात भारतीय असलेला बौद्ध धम्म सापडला. त्याकडे त्यांनी वाटचाल सुरु केली. मुंबईत कॉलेज उघडले. त्याला सिद्धार्थ हे नाव दिले. तेव्हाच त्यांची वाटचाल कोणत्या दिशेने हे लक्षात आले. शोषण मुक्त समाजाचा कृतीशील विचार मांडणारे कार्ल मार्क्स होते. त्यांची जगात पुरोगामी अशी ओळख होती. त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ गौतम बुद्ध असल्याचे विधान डॉ.आंबेडकरांनी केले. त्यांनी मुस्लीम व ख्रिश्चन धर्मांकडून प्रलोभने आली ती नाकारली. यापैकी कोणताही धर्म अंगीकारला असता, तर आज दिसणारा भारत दिसला नसता. या देशाचा कदाचित नकाशाही बदललेला दिसला असता. त्यांनी मूळ भारतीय संस्कृतीतून उदय झालेला बुद्ध धम्म स्वीकारला. या धम्मात जात लोप पावते हे तथागतांनी सिद्ध करून दाखविले होते. राजा आणि रंकाला एका रांगेत आणले होते. वर्ण, वर्ग, लिंग असा भेदाभेद नव्हता. त्या धम्माच्या दीक्षेसाठी त्यांनी नागपूर हे मध्यवर्ती ठिकाण निवडले. १४ ऑक्टोबर-१९५६ रोजी धम्मदीक्षा घेतली. लाखो लोकांना धम्मदीक्षा दिली. त्या परिवर्तन भूमीचे नाव दीक्षाभूमी आहे. त्या भूमीतून धम्म प्रवर्तनाचे चक्र दरवर्षी नित्य नेमाने फिरत असते. जगभरातून लोक येतात. धम्मदीक्षा घेतात. हा क्रम कधी थांबत नाही. भविष्यातदेखील थांबणार नाही. क्षणभर कल्पना करा. महानिर्वाणाअगोदर त्यांना हिंदू धर्म त्यागता आला नसता, बुद्ध धम्माचा अंगीकार करता आला नसता, तर इतिहास वेगळा असता. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतःच इतिहास घडवित गेले. हिंदू म्हणून मरणार नाही, हे त्यांनी बौद्ध धम्माचा अंगीकार करून सिद्ध केले. ते चार शब्द आज क्रांती गीत बनलेत. अनेकांच्या ओठावर आहेत. या शब्दांवर अनेक प्रेरणादायक गीते रचली गेलीत. ती गाणी माणसातील माणुसकी जागवित आहेत. माणसाला गदागदा हलवित आहेत.

त्यांनी स्वतःला देश, समाज आणि धम्माला वाहून घेतले. त्यांनी धम्म ग्रंथ लिहिण्याचे काम हाती घेतले होते. दीक्षेनंतर पावणे दोन महिन्यांत ते पूर्ण केले. यात प्रकृतीकडे दुर्लक्ष झाले. 'बुद्ध अँड हिज धम्म' हा ग्रंथ पूर्ण केला तेव्हा सुटकेचा निश्वास सोडला. हा ग्रंथ जगभरातील बौद्धांना प्रेरणा देणारा, योग्य दिशा देणारा ग्रंथ ठरला. ग्रंथ पूर्ण केल्याचे समाधान चेहऱ्यावर झकळले. प्रकृती साथ देत नसल्याची त्यांना जाणीव होती. त्यानंतर अवघ्या तीन दिवसांनी दिल्ली मुक्कामी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांनी या दोन धम्म कार्यासाठी मृत्यूला थांबविले होते. ते खरे बोधीसत्व होते. त्यांचा ६डिसेंबर-१९५६ हा महानिर्वाण दिन. तो क्षण वेदनादायी आहे. तो आठवला, की जगातल्या शोषित, वंचितांचे डोळे पाणावतात. ज्यांच्या आयुष्यातील प्रत्येक चढउतार, घटना, घडामोडी प्रेरणादायक आहेत. वर्तमानात त्यांच्या नावाचा जयजयकार आहे. संविधानाचा जयघोष आहे. संविधान मस्तकी लावून नतमस्तक होणारे आहेत. संविधानाची शपथ घेत सत्तेत येणारे आहेत. ते धर्मनिरपेक्षतेची ग्वाही देतात. विशिष्ठासाठी बुलडोजरची राजनीती करतात. 'बटेंगे तो कटेंगे' चे नारे लावतात. संविधान व आंबेडकरांचे गोडवेही गातात. त्यांच्यातील आईचे व दायीचे प्रेम उघड दिसते. चला असे दिखाऊ राजकारण गाडून टाकू. प्रामाणिक राजकारणाचे नवे युग आणू. महामानवाला अभिवादन करू. ते आंबेडकरांना सच्चे अभिवादन ठरेल. त्या दिशेने वाटचाल करू.

## वर्तमान

# विचार चांगला; वास्तव मात्र भीषण..



**मोहन बोरगांवकर**
8421015682
ज्येष्ठ पत्रकार, अकोला

**तीन मुले आणि अडथळ्यांची शर्यत...:** 'लेकूरे उदंड झाली, ते तो लक्ष्मी निघोनी गेली, बापुडे भिकेस लागली अन्न खायला मिळेना', असे संत रामदास स्वामींनी लिहिले आहे. सार्थ दासबोध या अत्युत्तम ग्रंथातील या ओळी त्या काळात सयुक्तिक होत्या. जनसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या त्यातून अधोरेखित होतात. काळ आणि परिस्थिती बदलली आहे. आता कमी होत चाललेली लोकसंख्या चिंतेचे कारण होऊ पाहत आहे. या महत्त्वाच्या विषयावर सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी एका कार्यक्रमात भाष्य केले. हिंदू समाजाची लोकसंख्या कमी होत आहे. ती टिकवण्यासाठी प्रत्येक कुटुंबात किमान तीन अपत्ये असावीत, असे मत त्यांनी नोंदविले आहे.

**किमान तीन मुले जन्माला घाला..:** नागपूर येथे कठाळे परिवारातर्फे कुळ संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात बोलताना त्यांनी हा महत्त्वाचा विषय छेडला. त्यावर मार्मिक भाष्य केले. देशाच्या भविष्यासाठी योग्य लोकसंख्या वाढीचा दर राखणे महत्त्वाचे आहे, असा दावा मोहनजी यांनी केला.

देशात हिंदूंची संख्या कमी होत आहे हा चिंतेचा विषय आहे. लोकसंख्या शास्त्र सांगते, की लोकसंख्या वाढीचा दर २.१ पेक्षा खाली गेल्यास तो समाज नष्ट होतो. आता पॉईंट एक माणूस तर जन्मत नाही, त्यामुळे दोनपेक्षा जास्त म्हणजे कमीत कमी तीन अपत्ये असावीत, असे विधान त्यांनी केले.

कुटुंब समाजाचा घटक आहे. समाजात कसं राहायचं हे माणूस कुटुंबातून शिकतो. लोकसंख्या कमी होत आहे, हा चिंतेचा विषय आहे. लोकसंख्या शास्त्र सांगते, की लोकसंख्या वाढीचा दर २.१ पेक्षा खाली गेला तर तो समाज नष्ट होतो. कोणी त्याला मारेल असं नाही, तर तो समाज असाच नष्ट होतो. पृथ्वीच्या पाठीवर अनेक भाषा आणि समाज, असेच नष्ट झाले आहेत. आपल्या देशाची लोकसंख्या नीती २००० मध्ये ठरली. त्यातही सांगण्यात आले, की लोकसंख्या वाढीचा दर २.१ पेक्षा खाली जायला नको.

**वास्तव आहे वेगळेच..:** मोहनजी भागवत यांनी व्यक्त केलेले विचार मोलाचे, तसेच चिंतन करण्यास बाध्य करणारे आहेत. या संदर्भात दिसणारे वास्तव मात्र वेगळे आहे. त्यामुळे लोकसंख्या वाढ रोखण्यात कोणत्या बाबी कारणीभूत आहेत, याचाही सागोपांग विचार होणे गरजेचे ठरते. वेगवेगळ्या समस्या आणि कारणे त्यामागे दडलेली आहेत. दाम्पत्याची मानसिकता, कौटुंबिक परिस्थिती, युवा पिढीत रुजलेले गैरसमज, आधुनिक विचारसरणीचा प्रभाव, याचाही साकल्याने विचार करण्याची गरज आहे.

**मुलांची फौज...:** आपल्या दोन- तीन पिढ्यांच्या आधी 'मुलं म्हणजे देवाघरची फुलं', हा विचार रुजवला गेला होता. किती मुलं व्हावीत हे काय आपल्या हातात आहे, अशी बाळबोध विधानेही ऐकायला मिळायची. कुटुंब नियोजनाचा फारसा प्रचार आणि प्रसार नव्हता. प्रत्येकाची मानसिकता वेगळी होती. नवीन काही स्वीकारणे सहज शक्य नव्हते. त्यामुळे घर कसं गजबजलेलं असायचं. डझन- अर्धा डझन मुलांची फौज बहुतेक घरी असायचीच.

काबाडकष्ट करून कुटुंब पोसणे ही तारेवरची कसरत अनेकजण लिलया पेलत होते. कोरडी चटणी-भाकर हा दैनंदिन आहार असलेली मंडळी आपल्या घरी कुटुंबात सुखाने नांदत होती. जीवन जगताना काय टक्के टोणपे झेलावे लागतात, काय सोसावं आणि भोगावं लागतं, हे या मंडळींना ठाऊक होतं. या व्यक्तींचे अनुभव जेव्हा बोलताना पाझरतात, तेव्हा थक्क व्हायला होतं.

**हम दो हमारे दो...नंतर एक..:** काळासोबत परिस्थिती बदलली. नवीन आव्हाने समोर आली. प्रत्येकाने आपल्यात काळानुरूप बदल केले. कुटुंब आटोपशीर ठेवणे या बाबीकडे गांभीर्याने बघितले जाऊ लागले. सुरुवातीला 'हम दो हमारे दो' हा नारा काहींनी कृतीत उतरवला. नंतर 'हम दो हमारा एक' हे बिरुद छोटेखानी कुटुंबाचा आदर्श ठरले. आता काही ठिकाणी 'हम दो हमारा खुदका कुछ नहीं', अशी परिस्थिती बघायला मिळते. परिस्थितीने वैतागलेल्या काहींनी मग दत्तक मुलं घेण्याचे व्यावहारिक पाऊल उचलले. आता तर दत्तक मुलं मिळणे ही लॉटरी लागण्यासारखी परिस्थिती आहे. अनेक गर्भश्रीमंत दत्तक मुलांसाठी आस लावून बसले आहेत. याबाबतची प्रक्रिया खूप कडक आणि तेवढीच किचकटदेखील आहे.

**लग्नसमस्या बिकट..:** आता तर मुलांमुलींच्या लग्नाची समस्या मोठी बिकट झाली आहे. उच्चशिक्षित, भरपूर पगार, आर्थिक स्थैर्य, घरदार, इस्टेट, गाडी-बंगला हे सर्व काही असलेल्या मुलांनाही त्यांच्या अनुरूप जोडीदार मिळत नाही. बहुतेक मुलीही उच्चशिक्षित आणि नोकरी करणाऱ्या आहेत. त्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मनासारखा जोडीदार मिळून लग्न ठरणे आणि ते टिकणे कठीण झाले आहे. ग्रामीण भागात परिस्थिती अधिक बिकट आहे. शेतकरी, कष्टकरी, तसेच उद्योग-व्यवसाय करणाऱ्या मुलांना लग्नासाठी मुलीचं येत नाहीत. हितसंबंधी आणि नातेवाईक यांच्यामार्फत होणारी लग्ने काय तो अपवाद ठरत आहेत.

आता तुम्हीच सांगा मोहनजी या अडलेल्यांची केव्हा लग्ने होणार. केव्हा ती बापुडे तीन मुलांना जन्माला घालणार. आणि विशेष म्हणजे त्यांचे सुयोग्य पालनपोषण कोण करणार.. प्रश्न मोठा बिकट आहे.

**नसीब अपना अपना..:** मुला-मुलींची उशिरा लग्ने होत आहेत. एखाद्याला नशिबाने एखादे अपत्य झाले तरी तो 'जश्न' करण्याचा विषय ठरू पाहतो आहे. काहींना खूप प्रतीक्षा करावी लागत आहे. वंध्यत्वाची समस्या बघावयास मिळते. बाळाच्या आशेपोटी धंदेवाईक डॉक्टर मंडळींकडून अशा अवस्थेतील जोडप्यांची आर्थिक लूट सुरू आहे. शाश्वती कुणाची नाही. काही मुलींना मुलचं नको असतं. आपल्या सुंदरपणावर परिणाम होईल, असा गैरसमज त्यांनी करून घेतला आहे. त्यामुळे आपल्या आवाहनानुसार जे हिंदूंची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करतील त्याचे निश्चित स्वागत आहे. आपला विषय गंभीर आहे. मनन-चिंतन करायलाच हवे.


'आखीर बच्चे भगवान का रूप होते है, मगर किसके नसिबमें क्या लिखा है ये कोई नहीं जानता, बस यही सच्चाई है.' तीन मुले जन्माला घालणे सद्यस्थितीत इतके सोपे नाही. ती अनेक समस्यांचा सामना करायला लावणारी अडथळ्यांची शर्यत आहे.

## वास्तव

# बालविवाह समस्येवर कायम तोडगा आवश्यक!



**प्रा. मधुकर चुटे**
9420566404



शाळा पातळीवर मुलांच्या तुलनेत मुलींची गळती जास्त होताना आढळते. तथापि मुली शिकल्या, की त्या विचारशील होतात. त्यांच्या कुटुंबाचीही प्रगती होते याविषयी मात्र जागरुकतेचा मोठा अभाव आढळतो. कायद्याची कठोर अंमलबजावणी करून त्याचा धाक निर्माण करणे, मुलींच्या दृष्टीने सामाजिक वातावरण सुरक्षित करणे आणि त्याचबरोबरीने सामाजिक जागरूकतेचे अधिक प्रयत्न निरंतर सुरू ठेवणे, हाच सद्यस्थितीत योग्य व्यवहार्य उपाय आहे.

आपल्या भारतीय समाजात मुलींचे लग्नाचे वय हा नेहमी चर्चेचा विषय असतो. अगदी सर्वोच्च न्यायालयालादेखील यावर दखल घ्यावी लागली. विवाह ही वैयक्तिक बाब आहे. तो सार्वजनिक चर्चेचा विषय नाही, असे मत शहरी भागातील तरुणी ठामपणे मांडताना आढळतात. मुलींचे लग्नाचे वय वाढत चालले, असेही मत सरसकट व्यक्त होताना आढळते; पण देशात अजूनही बालविवाह मोठ्या संख्येने पार पडतात हेच कदाचित बहुसंख्यांना माहीत नसेल किंवा ती पूर्वीची जुनी समस्या होती, असेही वाटू शकेल. तथापि भारतात आतापर्यंत जवळपास वीस कोटी मुलींचे बालविवाह लावले गेले, असा निष्कर्ष संयुक्त राष्ट्र संघाच्या एका अहवालात नमूद केले आहे. जगातील इतरही देशांत असे विवाह होतात, असेही त्यात म्हटले आहे. या समस्येला आळा घालण्यासाठी कायदे निर्माण करण्यात आले आहेत. कठोर शिक्षेची तरतूददेखील कायद्यात केली आहे. कायद्यात वेळोवेळी सुधारणा होताना आढळतात. बालविवाह लावणाऱ्या पालकांवरदेखील कारवाई झाल्याचे वृत्त अधूनमधून माध्यमांत प्रसिद्ध होते. तरीही छुप्या पद्धतीने बालविवाह मोठ्या संख्येने पार पडतात. त्यावर उपाययोजना करताना या समस्येच्या मूळ कारणांचाही शोध घेतला पाहिजे.

काही दशकांपूर्वी बालविवाहाची मोठी परंपरा होती. म्हणून वीस कोटी विवाहांमागे केवळ तेच कारण मानणे हा निव्वळ वेडेपणा ठरू शकतो. गरिबी आणि मुलींच्या दृष्टीने असुरक्षित सामाजिक वातावरण याकडे या क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते लक्ष वेधून घेतात. गरिबीमुळे चार पैसे कमावण्यासाठी घर सोडणे अनेक मुलींच्या आई-वडिलांसाठी अपरिहार्य असते. त्यांच्यामागे मुलींकडे लक्ष कोण ठेवणार, त्यांच्या पश्चात मुलींच्या बाबतीत दुर्दैवी घटना घडली तर, अशी भीती पालकांना वाटत असते. त्यावर मात करण्यासाठी मुलींचे अकाली लग्न लावले जाताना आढळते. अनेक कुटुंबे कामासाठी सतत स्थलांतर करतात. मुलींना कुठे आणि कोणाच्या भरवशावर ठेवायचे, त्यापेक्षा त्यांचे लग्न करून जबाबदारीतून मुक्त होण्याकडे अनेकांचा कल आढळतो. याला सरकार कसा आळा घालणार हा खरा प्रश्न निर्माण होतो. शाळा पातळीवर मुलांच्या तुलनेत मुलींची गळती जास्त होताना आढळते. तथापि मुली शिकल्या, की त्या विचारशील होतात. त्यांच्या कुटुंबाचीही प्रगती होते याविषयी मात्र जागरुकतेचा मोठा अभाव आढळतो. कायद्याची कठोर अंमलबजावणी करून त्याचा धाक निर्माण करणे, मुलींच्या दृष्टीने सामाजिक वातावरण सुरक्षित करणे आणि त्याचबरोबरीने सामाजिक जागरूकतेचे अधिक प्रयत्न निरंतर सुरू ठेवणे, हाच सद्यस्थितीत योग्य व्यवहार्य उपाय आहे.

नागपूर

## वाचक विचार मंच


# एटीएम इतिहासजमा होणार?

केंद्र सरकारने संसदेत नुकत्याच दिलेल्या माहितीप्रमाणे देशातील एटीएमच्या संख्येत घट झाली आहे. देशात गेल्यावर्षी २ लाख ५७ हजार ९४० इतके एटीएम बूथ होते. यंदाच्या सप्टेंबर २०२४ अखेर एटीएमची ती संख्या अंदाजे १ टक्क्यापेक्षा थोडी कमी होऊन २ लाख ५५ हजार ७८ होती इतकी झाली. विशेष म्हणजे महानगरे, शहरे आणि ग्रामीण भाग अशा सर्वच ठिकाणी एटीएमची संख्या घटली आहे. विशेषतः ग्रामीण भागात २.२ टक्के एटीएम केंद्र बंद झाली आहेत आणि याचे मुख्य कारण म्हणजे यूपीआय पेमेंट्सचा वाढता वापर. डिजिटल पेमेंट्समुळे अधिक रोख बाळगण्याची गरज संपल्याने एटीएमची संख्या हळूहळू कमी होत आहे. देशात तळागाळातल्या नागरिकांपर्यंत ज्या वेगाने डिजिटल पेमेंट्स व्यवहार वाढत चालले आहेत त्यावरून लवकरच एटीएम कदाचित इतिहासजमा होतील, अशी शक्यता निर्माण झाली आहे. मोबाईल क्रांतीमुळे जसजसे ठिकठिकाणचे पीसीओ बॉक्स बंद पडले, तसेच आता एटीएम बूथ कमी होत जातील. देशातील पहिलावहिला एटीएम २७ जून १९८७ रोजी हाँगकाँग अँड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन (एचएसबीसी) ने मुंबईत उभारला होता. एटीएममुळे ग्राहकांना बँकेत न जाता पैसे काढता येऊ लागल्यामुळे बँकिंग व्यवहारात मोठी क्रांती झाली होती. मात्र, डिजिटल बँकिंगमधील क्रांतीमुळे एटीएमचा वापर कमी होणार आहे.

**प्रदीप शंकर मोरे**
मुंबई
मो. नं.: ९८७०७७७२७४

## गुल्लेर

# लगन सोपी नाही..



**नरेंद्र इंगळे**
9561226572

'ओ मावसा.. जमवा आपलं.. पाहा एखांदी पोरगी..'

'काहून थयथय करून राह्यला बे? लगन झाल्यावर काही खरं नाही बाबू.. मानूस घान्याचा बैल होते..हे आना.. ते आना.. सकाऊन उठलो की तुही मावशी हाती थैल्या देते.. आना बेसन.. आना तेल.. आना बजार..'

'मी सगळी हौस पुरोतो बायकोची.'

'नवीन नवीन कोनताही मानूस तसाच म्हनते.. बायकोचा लाळ एक लेकरु होयेलोकच असते.. लेकरु होयाच्या आगुदर बायको मोठी गोड बोलते.. सोन्या म्हनते.. जानू म्हनते.. एक लेकरु झालं की आंगावर सरकी होते.'

'मावशी सरकी होते काय तुमच्यावर?'

'रोजच आंगावर येते.. पायटून तोंडावरची चादर ओढते.. उठ म्हनते.. व्हय सरका नळावर.. भर पानी.. थंडीत मानसाचे येले करते.'

'तुम्ही भरता काय पानी?'

'पानी भराच लागते.. चौकातल्या नळातून पाच-सहा खेपा आनतो.. लगन झाल्या एक वर्ष तुह्या मावशीनं पानी भरुलागलं.. आता म्हनते माही कंबर दुखते.'

'पानी मीच भरतो, कपडेही धुतो.. फक्त एखांदी पोरगी पाहून द्या.'

'बायकोचा खर्च ठाऊक नाही तुले.. आठ दिवसातून तोंडाले फेशियल करते..

सतरा साबनं आना म्हनते.. आंगाचं साबन अलग.. केसाचं अलग.. कपड्याचं अलग.. भांडे धुयाचं.. लेकराचं अलग.. '

'हो राज्या.. मावशी लय आटानं राह्यते. कधी पहाव त चोपडीचटक दिसते.'

'अन् मले इस्तरी कराले टाईम भेटत नाही. हातपाय घासाले टाईम नसते. कयकला राह्यलो की तिकून तुही मावशी कल्ला करते.'

'काय म्हनते मावशी?'

'पहाळात राह्यता काय? आदीमानव आहा काय? कसेही राह्यता बह्याळासारखे.. निपक राह्यत जा.. मी शोभली पाह्यजे तुमाले.'

'तुम्ही लयखेप गयाठे राह्यता राज्या?'

'आता काय वावरात इस्तरीचे कपडे घालून जाऊ? तुह्या मावशीले कल्ला कऱ्याची सवयच आहे. त्या चार बहिनी आहेत.. तीन मेव्हने.. एकदोन मुक्कामीच असतात.. काढा भजे.. आना तूप.. करा बायतिळे.. आना अहीर.. घ्या आंधन.. दरसाल तिच्या गनगोताचा खर्च राह्यते.. म्हनून म्हनतो की, लगन काही सोपी नाही.'

धुमारा

### ते पुन्हा आले

कित्येकांच्या स्वप्नांना
लागला अखेर चुना
हो, नाही करता करता
देवाभाऊ आले पुन्हा

दिल्लीश्वरांनी सर्वांनाच
बरेच दिवस झुलवले
बहुमताची 'वर्षा' होताच
अखेर 'कमळ' फुलवले

शपथविधीच्या निमित्ताने
आता हेच वाक्य स्मरे
नांदा सौख्य भरे!
नांदा सौख्य भरे!!

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद

# फास्टफूड आरोग्यास घातक!

आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा, असे आहारशास्त्र सांगते, पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही. मग आधार घेतला जातो तो फास्टफूडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफूड आवडीने खातात. विशेषतः शाळकरी मुलांना तर फस्टफूड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी- पोळी खाताना किरकिर करणारी मुले फास्टफूड मात्र मिटक्या मारत खातात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफूडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेलेदेखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थांत कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे, असा सल्ला डॉक्टर आणि आहारतज्ज्ञ देत असतात. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफूड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते, की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थांत आणि शीतपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यांसारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलांच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. कंपनीने या पदार्थांत कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफूडचा हट्ट सोडत नाही. काही पदार्थांत तर शरीरास हानिकारक घटक असतात. तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफूड पदार्थांत शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले; मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत, की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत, की त्यांच्या पदार्थांत शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफूड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. अतिप्रमाणात फास्टफूड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफूड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो, असे जाणकार सांगतात. त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफूडपासून दूर ठेवायला हवे. फास्टफूडऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यांसारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. नं.: ९९२२५४६२९५

**मराठी रंगभूमी**

■ देवबाभळी
दु. ४.३०, दीनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले

■ नियम व अटी लागू!
दु.४.३० प्रबोधनकार ठाकरे, बोरिवली

## नागपूर-मुंबई विमान तिकिटाने गाठला २० हजार रुपयांचा पल्ला



**मुंबई :** राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा गुरुवारी सायंकाळी आझाद मैदानावर शपथविधी सोहळा पार पडला. या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी अनेकांनी विमानाने मुंबईवारीचा बेत आखला. मात्र, बुधवारी सायंकाळच्या नागपूर-मुंबई विमानाचे तिकीटदर तब्बल २० हजारांवर, तर गुरुवार सकाळी विमानाचे तिकीट दर २५ हजारांवर पोहोचले. त्यामुळे शेकडो शुभचिंतक बुधवारी सायंकाळनंतर आपल्या चारचाकी वाहनांनी समृद्धी महामार्गाने मुंबईसाठी रवाना झाले. फडणवीस मुख्यमंत्री होणार ही नागपूरकरांसाठी अभिमानाची बाब आहे. फडणवीस यांचा मोठा चाहता वर्ग नागपूरसह विदर्भात आहे. त्यामुळे त्यांच्या शपथविधीला उपस्थित राहण्यासाठी अनेकांनी मुंबईवारीचा बेत आखला. अनेकांनी गुरुवारी सकाळी विमानाने रवाना होण्याचे नियोजन केले. मात्र, बुधवारी सायंकाळपर्यंत गुरुवार सकाळच्या नागपूर-मुंबई विमानाच्या तिकीट दरांनी २० हजार रुपयांचा पल्ला ओलांडला. इंडिगोचे (जीई ५००२) सकाळी ६: ०५ वाजता मुंबईला जाणाऱ्या विमानाचे तिकीट १७ हजार ६६९ रुपयांवर होते, तर इंडिगोच्या सकाळी ८.२५ वाजताच्या विमानाचे तिकीट तब्बल २० हजार ७२० रुपयांवर पोहोचले होते. एअर इंडियाच्या (एआय ६२८) विमानाचे तिकीट सायंकाळी ६ वाजता १६ हजार १६० रुपयांना होते. मात्र, सायंकाळी ७.१५ वाजता हे दर वाढून तब्बल २५ हजार ३४९ रुपयांवर पोहोचले. रात्री उशिरापर्यंत तिकीट दरात हजार-दोन हजार रुपयांचा चढउतार सुरू होता. मात्र, तिकीट दर फारसे कमी झाले नाही. विमान तिकिटांचे वाढलेले दर पाहून अनेकांनी समृद्धी महामार्गाने मुंबईला जाणे पसंती दिली.

**वेचक**

## नेहरू सेंटर आर्ट गॅलरीत महुआ रे यांचे अँनाज... स्प्रिंग फोर्थ चित्र-शिल्प प्रदर्शन

**मुंबई :** सुप्रसिद्ध चित्रकर्ती महुआ रे हिच्या नवनिर्मित कॅन्व्हासवरील तैलचित्रांचे व ब्रॉन्झमधील शिल्पांचे एकल कलाप्रदर्शन नेहरू सेंटर कलादालन, डॉ.अँनी बेझंट रोड, वरळी, मुंबई येथे ३ ते ९ डिसेंबर २०२४ या दरम्यान भरणार आहे. ते तेथे सर्वांना रोज सकाळी ११ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत विनामूल्य बघता येईल. या प्रदर्शनात तिने ठेवलेली चित्रे व शिल्पाकृती तिच्या कल्पकतेचे व सौंदर्यदृष्टीचा वापर करून तयार केलेल्या अद्‌भुत भावनात्मक कलाकृतींचे वास्तववादी शैलीत सर्वांना दर्शन घडवितात. महुआ रे हिच्या कलाप्रवासाची सुरुवात तिच्या बालपणातील आईच्या सहवासात केलेल्या अवकाश निरीक्षणातून व अंतरिक्ष दर्शनातून झाली. तिने भारतातील व परदेशातील प्रमुख कलादालनातून एकल व सामूहिक प्रदर्शनातून आपल्या चित्रांचे व शिल्पांचे सादरीकरण केले. मुंबई, नवी दिल्ली, बंगलोर, गोवा, न्यूयॉर्क, कॅनडा, लंडन, पॅरिस, दुबई, अहमदाबाद इत्यादी ठिकाणी तिच्या प्रदर्शनांना रसिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला व त्यामुळे कलाक्षेत्रात आणखी कलाकृती सादर करण्यासाठी योग्य उत्तेजन मिळाले. तिला अनेक भारतीय व विदेशी कलाप्रवर्तक संस्थांकडून पारितोषके मिळाली असून तिचा गौरव झाला आहे. अनेक मान्यवर कलासंग्राहकांकडे तिची कलारूपे संग्रही आहेत. प्रस्तुत प्रदर्शनात ठेवण्यात येणारी महुआ रे हिने तयार केलेली तैलरंगातील कॅनव्हासवरील चित्रे व ब्रॉन्झमधील शिल्पाकृती मानवी मनात विविध वातावरणात व प्राकृतिक वैशिष्ट्यामुळे वेगवेगळ्या ऋतूंमध्ये जागृत होणाऱ्या मनोभावना आणि त्यांचे अनेक पैलू दर्शवितात.

## देवेंद्र फडणवीस यांना राज ठाकरे, नवनीत राणा यांनी दिल्या शुभेच्छा



◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर महायुतीसह विरोधी पक्षातील नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या.

> पुढचे पाच वर्ष सरकारच्या कोणत्याही चांगल्या उपक्रमात माझा आणि माझ्या पक्षाचा पाठिंबा असेल, फडणवीसांना २०१९ मध्ये ही संधी मिळायला हवी होती, २०२२ मध्ये ही फडणवीसांची संधी हुकली. तिसऱ्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर आता फडणवीसांनी मिळालेल्या संधीचा योग्य वापर करावा.
>
> **- राज ठाकरे**

> ज्या लोकांनी २०१९ मध्ये धोका दिला होता, धोका देऊन ज्यांनी २०१९ ला शपथ घेतली, आज यावरून हे सिद्ध होतंय की, धोकेबाजांना महाराष्ट्राची जनता बाजूला करते. जो सत्याची लढाई लढतो तो मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतो. धोकेबाजांना महाराष्ट्राच्या जनतेने चांगला धडा शिकवला. जे स्वप्न आम्ही पाहत होतो ज्यासाठी लढत होतो. सगळी हिस्ट्री डोळ्यासमोरून गेली.
>
> **- नवनीत राणा**

# उद्योग, लाडकी बहीण योजना, महायुती सरकारचे ध्येय-उद्दिष्ट

**शपथ विधीनंतर पत्रकार परिषदेत दिली पुढील पाच वर्षांतील विकासाची ग्वाही**

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**



महायुतीला प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर आज महायुतीचा शपथविधी सोहळा पार पडला. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही उपमुख्यमंत्र्यासह मंत्रिमंडळाची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर स्वाक्षरी करून एका रुग्णाला पाच लाखांचा निधी दिला. तसेच मंत्रिमंडळ बैठकीनंतर त्यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी त्यांनी उद्योग, लाडकी बहीण योजना, महायुती सरकारचे ध्येय-उद्दिष्टे आणि पुढील पाच वर्षांतील योजनांबाबत माहिती दिली. तसेच विरोधकांचा आवाजही ऐकला जाईल, असेही स्पष्ट केले. तसेच मागच्या पाच वर्षांत राज्यात उलटसुलट राजकारण झाले, त्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे उत्तर दिले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागच्या पाच वर्षांत राज्याने खूप काही राजकारण पाहिले, पुढची पाच वर्ष वेगळे राजकारण पाहायला मिळणार का? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला. यावर ते म्हणाले, "यावेळी पूर्णपणे वेगळे राजकारण असेल. मी आधीच सांगितले की, मला बदल्याचे नाही तर बदल दाखवेल, असे राजकारण करायचे आहे. विरोधकांची संख्या कमी आहे, हे खरे आहे. पण विरोधकांच्या आवाजावर किंवा त्यांच्या संख्येवर आम्ही मूल्यमापन करणार नाही. त्यांनी योग्य विषय मांडले.

### लवकरच होणार मंत्रिमंडळाचा विस्तार

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली असली तरी विधानसभा अध्यक्ष आणि मंत्रिमंडळाचा विस्तार बाकी आहे. मुंबईच्या विशेष अधिवेशनातच विधानसभा अध्यक्षांची निवड केली जाईल. त्यामुळे ७, ८ आणि ९ डिसेंबर रोजी आमदारांचे शपथविधी होतील. ९ डिसेंबर रोजी विधानसभा अध्यक्षांची निवडणूक होईल आणि ९ तारखेलाच राज्यपालांनी अभिभाषण करावे, असे निवेदन मंत्रिमंडळाने राज्यपालांना पाठवले असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले. हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा शपथ विधी होईल.

### शपथविधीचे आमंत्रण दिले, पण...

आज शपथविधीचे आमंत्रण सर्वच माजी मुख्यमंत्र्यांना दिले होते. तसेच राज ठाकरे यांनाही शपथविधीचे आमंत्रण मी स्वतः फोन करून दिले होते. मात्र त्यांच्या वैयक्तिक कार्यक्रमामुळे ते येऊ शकले नाहीत. महाराष्ट्रातला राजकीय संवाद कधीही संपलेला नाही.

### लाडकी बहीण सुरूच राहणार...

लाडकी बहीण योजनेबाबत देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले. मागचे सरकार हे गतिशील असे सरकार होते. आज आमची जी जाहिरात होती की महाराष्ट्र आता थांबणार नाही. लाडकी बहीण योजना आम्हीच सुरुच ठेवणार आहोत. तसेच २१०० रुपयेही आम्ही देणार आहोत.

## महायुतीच्या महाशपथविधीला बेस्टच्या ५८२ बसगाड्या

**मुंबई :** महायुतीचा महा शपथविधी सोहळा गुरुवारी सायंकाळी मुंबईतील आझाद मैदानावर पार पडला. यावेळी राज्यभरातून महायुतीचे हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते. शपथविधी सोहळ्याला आझाद मैदानावर येण्यासाठी महायुतीने खाजगी बसगाड्यांबरोबरच वातानुकूलित तसेच विनावातानुकूलित अशा तब्बल ५८२ बसेस आरक्षित केल्या. यातून बेस्ट उपक्रमाच्या तिजोरीत एका दिवसात तब्बल ७५ लाखांचा महसूल जमा झाला. विधानसभा निवडणुकीत महायुतीला जनतेने एक हाती सत्ता स्थापन करण्याचा बहुमान दिला. २३ नोव्हेंबर रोजी निकाल झाल्यानंतर तब्बल १२ दिवसांनी गुरुवारी आझाद मैदानात महायुतीचा शपथविधी सोहळा पार पडला. हजारोंच्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. पदाधिकारी कार्यकर्त्यांना आझाद मैदानावर ने-आण करण्यासाठी महायुतीने खाजगी बसेससह बेस्ट उपक्रमाच्या बसेस आरक्षित केल्या होत्या.

## दैनिक प्रहारच्या चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेलमधील सुकापूर येथील लक्ष्मी पब्लिक स्कूलमध्ये ४३५ स्पर्धकांनी घेतला सहभाग**

◆ **पनवेल (प्रतिनिधी) :**

पनवेल येथील सुकापूरमध्ये दैनिक प्रहारतर्फे प्रथमच चित्रकला स्पर्धा पार पडली. एल. ए. पाटील एज्युकेशन सोसायटीच्या लक्ष्मी पब्लिक स्कूलमध्ये शुक्रवारी आयोजित केलेल्या चित्रकले स्पर्धेत ४३५ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. तिसरी चौथी एक गट पाचवी सहावी एक गट व सातवी ते नववी एक गट अशा तीन गटांत ही स्पर्धा घेण्यात आली. या तीनही गटात ४३५ स्पर्धक सहभागी झाले होते.

पाचवी ते नववी गटाची ही स्पर्धा सकाळी ११ ते १२ या वेळेत घेण्यात आली. तर तिसरी चौथी या गटाची स्पर्धा दुपारी एक ते दोन या दरम्यान घेण्यात आली. यावेळी लक्ष्मी पब्लिक स्कूलचे शिक्षक आशा कुलकर्णी , पूजा राजकर मशुरा मुल्ला,अभिजीत भोपी, कविता कुंभार, जॉयना आयझॅक, सायमिना म्हसेकर, स्वाती म्हात्रे, आईशा अन्सारी या शिक्षकांनी सहकार्य केले. एल. ए. पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष महेश



पाटील व सचिव प्रशांत गांगर्डे यांनी या स्पर्धेसाठी सहकार्य करीत स्पर्धेला सदिच्छा भेट दिली.

दरम्यान दैनिक प्रहारचे रायगड जिल्हा वितरण प्रमुख चंद्रकांत शिर्के आणि त्यांचे सहकारी अजय कोरे, रमेश शेट्टी यांचे या स्पर्धेसाठी सहकार्य लाभले. दैनिक प्रहारतर्फे स्पर्धकांना चित्र काढण्यासाठी पेपर पुरवण्यात आले होते, तसेच स्पर्धेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना दैनिक प्रहारतर्फे खाऊचे वाटप करण्यात आले. चित्रकलेचे विषय शाळेतर्फे स्पर्धकांना देण्यात आले होते. चित्र काढण्यासाठी रंग व इतर साहित्य स्पर्धकांनी सोबत आणले होते. दैनिक प्रहारने शाळेतील स्पर्धकांना चित्र काढण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने स्पर्धकांसह शिक्षकांनीही आनंद व्यक्त केला.

**एप्रिल ते नोव्हेंबर कालावधीत पश्चिम रेल्वेकडून तिकीट तपासण्याची सखोल तपासणी**

## फुकट्या प्रवाशांकडून पश्चिम रेल्वेने वसूल केले तब्बल ९३ कोटी



◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई उपनगरीय लोकल ट्रेन्स, मेल, एक्स्प्रेस तसेच पॅसेंजर ट्रेन्स आणि हॉलिडे स्पेशल ट्रेन्समध्ये तिकीट नसलेल्या, अनियमित प्रवाशांना आळा घालण्यासाठी तिकीट तपासणी मोहीम पश्चिम रेल्वेवरील सर्व वैध प्रवाशांना आरामदायी प्रवास आणि उत्तम सेवा देण्यासाठी चालवली जात आहे. एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ व्यावसायिक अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली अत्यंत अनुभवी तिकीट तपासणी पथकाने अनेक तिकीट तपासणी मोहीम राबवली. परिणामी ९३.४७ कोटी रुपयांची वसुली झाली. या रकमेत मुंबई उपनगरातील ३०.६३ कोटी रुपयांची वसुली देखील समाविष्ट आहे विभाग आहेत.

पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, नोव्हेंबरमध्ये बुक न केलेल्या सामानासह २.०१ लाख तिकिटविहीन, अनियमित प्रवाशांचा शोध घेऊन १२.९१ कोटी रुपये वसूल करण्यात आले.

याशिवाय नोव्हेंबर महिन्यातही पश्चिम रेल्वेने मुंबई उपनगरीय विभागात ८२ हजार प्रकरणे शोधून काढली असून ४.०३ कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे. एसी लोकल गाड्यांमधील अनधिकृत प्रवासी रोखण्यासाठी नियमित सरप्राईज तिकीट तपासणी मोहीम राबवली जाते.

> या मोहिमेचा परिणाम म्हणून, एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत सुमारे ४०,००० अनधिकृत प्रवाशांना दंड ठोठावण्यात आला आहे आणि १३१ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. पश्चिम रेल्वेने सर्वसामान्यांना नेहमी योग्य आणि वैध तिकीट घेऊन प्रवास करण्याचे आवाहन केले आहे.

## शपथविधीनंतर एका तासातच मुख्यमंत्री फडणवीसांनी घेतली मंत्रिमंडळ बैठक

**मुंबई (प्रतिनिधी) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर तीनही नेते हे मंत्रालयात आले. त्यांनी मंत्रालयातील महापुरूषांच्या प्रतिमांना वंदन केले. शपथविधी झाल्यानंतर पहिल्या तासातच महायुती सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक मंत्रालयात झाली. शपथविधीनंतर लगेचच मंत्रिमंडळाची बैठक घेऊन हे सरकार गतिमान असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकप्रकारे दाखवून दिले आहे. मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली. पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखाची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती. मंत्रालयात गेल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे लाडक्या बहिणींनी स्वागत केले. दरम्यान, राज्य मंत्रिमंडळ बैठकीत नवनियुक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्य रेल्वे चालवणार विशेष गाड्या

**प्रवाशांच्या सोयीसाठी ६, ७ आणि ८ डिसेंबर रोजी अनारक्षित गाड्या धावणार**

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मध्य रेल्वे महापरिनिर्वाण दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते नागपूर, अमरावती, कलबुरगी आणि दादर ते नागपूर,अदिलाबाद अशा अनारक्षित विशेष गाड्या चालवणार आहे. मध्य रेल्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली वाहण्यासाठी मुंबईत आलेल्या प्रवाशांच्या सोयीसाठी ६,७ आणि ८ डिसेंबर रोजी अनारक्षित विशेष गाड्या चालवणार आहे.

**तपशील खालीलप्रमाणे :**

दि. ६.१२.२०२४ रोजी सुटणाऱ्या गाड्या

ट्रेन क्रमांक ०१२४९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १६.४५ वाजता सुटेल.

ट्रेन क्रमांक ०१२५१ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १८.३५ वाजता सुटेल.

दि. ७.१२.२०२४ रोजी सुटणाऱ्या गाड्या

ट्रेन क्रमांक ०१२४६ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - कलबुरगी विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२५ वाजता सुटेल.

गाडी क्रमांक ०१२१७ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-अमरावती विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.४० वाजता सुटेल.



ट्रेन क्रमांक ०१२५५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १२.३५ वाजता सुटेल.

गाडी क्रमांक ०१२५३ दादर - नागपूर विशेष दादर येथून ००.४० वाजता सुटेल.

गाडी क्रमांक ०७०५७ दादर-आदिलाबाद विशेष दादर येथून ०१.०५ वाजता सुटेल.

दि. ८.१२.२०२४ रोजी सुटणाऱ्या गाड्या

ट्रेन क्रमांक ०१२५७ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १८.३५ वाजता सुटेल.

गाडी क्रमांक ०१२५९ दादर-नागपूर विशेष दादर येथून ००.४० वाजता सुटेल.

ट्रेन क्रमांक-०१२४९, ०१२५१,०१२५५, ०१२५३, ०१२५७ आणि०१२५९ ची संरचना आणि थांबे

१८ सामान्य द्वितीय श्रेणी.

दादर, कल्याण, कसारा, इगतपुरी, नाशिकरोड, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, जलंब, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा, सेवाग्राम आणि अजनी.

ट्रेन क्रमांक-०१२१७ ची संरचना आणि थांबे

१६ सामान्य द्वितीय श्रेणी.

दादर, कल्याण, इगतपुरी, नाशिकरोड, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, नांदुरा, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर आणि बडनेरा

ट्रेन क्रमांक-०१२४६ ची संरचना आणि थांबे

२४ सामान्य द्वितीय श्रेणी.

दादर, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, कुर्डूवाडी, सोलापूर, अक्कलकोट रोड आणि गाणगापूर रोड.

ट्रेन क्रमांक-०७०५७ ची संरचना आणि थांबे

१४ सामान्य द्वितीय श्रेणी.

कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, नगरसोल, रोटेगाव, लासूर, औरंगाबाद, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, पूर्णा, एच एस नांदेड, भोकर, हिमायतनगर आणि किनवट.सामान्य शुल्कासह अनारक्षित डब्यांसाठी बुकिंग यूटीएस द्वारे करता येईल. या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा.

रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी आणि मार्गदर्शनासाठी पुरेशा उपाययोजना केल्या आहेत. प्रवासी मदतीसाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर येथील हेल्प डेस्कशी संपर्क साधू शकतात.

## विधिमंडळाचे तीनदिवसीय अधिवेशन ७ डिसेंबरपासून होणार सुरू

**९ डिसेंबरला होणार सभागृहात बहुमत चाचणी**



◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

विधिमंडळाचे तीनदिवसीय अधिवेशन ७ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात विधानसभा अध्यक्षांची निवड होणार आहे. तर ९ डिसेंबरला बहुमत चाचणी घेण्यात येणार आहे. अधिवेशनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाला संबोधित करणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी गुरुवारी सांगितले की, '१५ व्या विधानसभेचे नवनिर्वाचित २८८ सदस्य ७ आणि ८ डिसेंबर रोजी शपथ घेणार आहेत. ९ डिसेंबर रोजी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन संयुक्त अधिवेशनाला संबोधित करणार आहेत. विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. त्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारची बहुमत चाचणी होणार आहे.

राष्ट्रवादीचे गटनेते अजित पवार म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यासाठी दादर येथील चैत्यभूमीला भेट देणार आहोत. राज्य सरकारने ६ डिसेंबर रोजी मुंबईत सार्वजनिक सुट्टी जाहीर केल्यामुळे मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व सरकारी कार्यालये शुक्रवारी बंद राहणार आहेत. दारूची दुकाने बंद राहणार आहेत. मंत्रिमंडळाचा विस्तार हा ११ डिसेंबर किंवा १२ डिसेंबरला होऊ शकतो.

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन हे १६ डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरू होणार आहे. हे अधिवेशन २१ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. देवेंद्र फडणवीस हे चहापाण्यासाठी विरोधी पक्षाच्या आमदारांना प्रथेप्रमाणे १५ डिसेंबरला निमंत्रित करणार आहेत.

**महाराष्ट्रातील नवीन सरकारच्या शपथविधी सोहळ्याला योगी आदित्यनाथांची उपस्थिती**

## फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रगती करेल : योगी



◆ **लखनऊ (प्रतिनिधी) :**

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुरुवारी महाराष्ट्र सरकारच्या शपथविधी सोहळ्याला हजेरी लावली. त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्याबद्दल देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर एकनाथ शिंदे,अजित पवार यांचे अभिनंदन केले.

### महाराष्ट्र समृद्धीचे नवे मापदंड प्रस्थापित करेल

मुख्यमंत्री योगी यांनी लिहिले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यशस्वी मार्गदर्शनाखाली आणि तुमच्या (फडणवीस) कार्यक्षम नेतृत्वामुळे 'विकसित महाराष्ट्र-सुरक्षित महाराष्ट्र' या संकल्पनेच्या पूर्ततेमुळे राज्य प्रगतीपथावर राहील, असा पूर्ण विश्वास आहे. सुशासन आणि प्रगती आणि समृद्धीचा मार्ग नवीन मानके स्थापित करेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाराष्ट्राच्या निवडणुकीत जोरदार रॅली काढली होती. निवडणूक प्रचारासाठी ते चार दिवसांसाठी येथे आले होते. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी २४ उमेदवारांच्या बाजूने प्रचार केला होता, त्यापैकी महायुती आघाडीच्या उमेदवारांनी २२ जागा जिंकल्या. या वेळी भाजपाच्या कार्यर्त्यांमध्ये उत्साहचे वातावरण होते.

> मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाउंट 'X' वर पोस्ट केले की, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा.
>
> **- मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ**

## पालिकेच्या कामाची महती सातासमुद्रापार

**लाखो अनुयायांना सेवा-सुविधा पुरविण्याचे मोलाचे कार्य**

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यातून अनुयायी चैत्यभूमीवर (दादर) येत असतात. या अनुयायांना नागरी सेवा-सुविधा पुरविण्याचे महत्त्वाच कार्य पालिका अत्यंत चोखपणे पार पाडत असते. गत अनेक वर्षांपासून पालिका प्रशासनाकडून हे कार्य अविरतपणे सुरू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दरवर्षी पालिकेच्या वतीने प्रकाशित केल्या जाणाऱ्या माहिती पुस्तिकेतून या कार्याची माहिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे



जीवनचरित्र सातासमुद्रापार पोहोचत असते. यंदाची माहिती पुस्तिकाही याच कार्याची पावती आहे, असे गौरवोद्‌गार भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे अध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी आज काढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ वा महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने पालिकेच्या जनसंपर्क विभागाद्वारे निर्मित आणि पालिका मुद्रणालयाद्वारा मुद्रित 'भीमा तुम्हा वंदना' या माहिती पुस्तिकेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमी येथे येणाऱ्या अनुयायांना पालिकेच्या वतीने पुरविल्या जाणाऱ्या नागरी सोयीसुविधांची माहिती देण्यात आली आहे. तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यावर आधारित, त्यांच्या कार्याचा महिमा वर्णन करणाऱ्या विविध अभिवादनावर गीतांचा समावेश करण्यात आला आहे.

# आदित्य महाविद्यालयाने विद्यार्थी घडविले!

**जिल्ह्यातली सर्व शाळेत करणार दंत तपासणी** | **पहिल्याच दिवशी ४८५ विद्यार्थ्यांची तपासणी** | **५६ विद्यार्थ्यांवर पीट सिलेंट उपचार** | **आदित्य महाविद्यालयातून सामाजिक दायित्वाची रुजवण**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेत मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आणि उज्वल भावी आयुष्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. आता आदित्य दंत महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम अंतर्गत पिट अँड फिशर सिलेंट प्रोग्राम जिल्हाभर राबवला जाणार असून आठवड्यातील दोन दिवस आदित्य दंत महाविद्यालयाचे विद्यार्थी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची तपासणी करत त्यांच्यावर उपचारही करणार आहेत. गुरूवारी याचा शुभारंभ जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालीका डॉ. आदिती सारडा यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रीय उच्च माध्यमिक व माध्यमिक विद्यालय बीड येथे झाला. यावेळी पहिल्याच दिवशी ४८५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यामधील ५६ विद्यार्थ्यांवर पीट अँड सिलेंट उपचार विद्यार्थ्यांनी तत्काळ केले.

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये दंत समस्या मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. या संदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम आदित्य दंत महाविद्यालयाच्या सहकार्याने जिल्ह्यात राबवण्याचा संकल्प केला आहे. याची सुरूवात गुरूवारी झाली. आदित्य महाविद्यालयाच्या वतीने आठवड्यातून

पान २ वर...





आदित्य शिक्षण संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या हितासाठी महाविद्यालयात उपक्रम राबवत आहे. शासनाने नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम च्या अंतर्गत आदित्य दंत महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालयाच्या वतीने राबवण्यात येणारा पिट अँड फिशर सिलेंट प्रोग्राम अतिशय संपूर्ण जिल्ह्यातील शाळेत राबवला जाईल. शासनाने टाकलेल्या विश्वासावर कधीही तडा जाऊ देणार नाही.

–डॉ.आदिती सारडा, संचालिका आदित्य शिक्षण संस्था, बीड



नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम च्या अंतर्गत येणाऱ्या पिट अँड फिशर सिलेंट प्रोग्राम या कार्यक्रमांतर्गत बीड जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये जाऊन फक्त तपासणीच न करता त्या ठिकाणी उपचार पद्धती सुद्धा उपलब्ध करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. प्रत्यक्ष शाळेत जाऊन त्या ठिकाणी पीठ आणि फिशर सिलेंट चे उपचार पद्धती करण्यात येणार आहेत.यासाठी आदित्य महाविद्यालयाचा मोठे सहकार्य आम्हाला मिळणार आहे.

–डॉ.अशोक थोरात, जिल्हा शल्यचिकित्सक, बीड

## नेकनूर मूकबधिर शाळेत अभिवादन



नेकनूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील मूकबधिर शाळेत ६ डिसेंबर वार शुक्रवार रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी अध्यक्ष म्हणून मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक श्री लुचारे सर व प्रमुख पाहुणे श्री राखुंडे सर उपस्थित होते. प्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य दीन दुबळ्या वंचित समाजासाठी व देशाच्या क्रांतीसाठी अर्पण केले. त्यांनी तयार केलेल्या संविधनामुळे आज आपण सुखी आणि सुरक्षित जीवन जगत आहोत. आज आपला संपूर्ण भारत देश हा त्यांनी आखून दिलेल्या कायद्याच्या आधारावर म्हणजे संविधानावर चालतो आहे. आणि हे सर्व करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तिथपर्यंत पोहोचण्यासाठी संघर्ष ही तितकाच

पान २ वर...

## बीडमध्ये आजपासून नाट्य स्पर्धा

**बिभीषण चवरे :नाट्य स्पर्धेचा आस्वाद घ्यावा**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज पासून राज्य नाट्य स्पर्धेला सुरुवात होत असून 'अचानक' या नाटकाने या स्पर्धे चा पडदा उघडणार आहे.महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत यावर्षी ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे आयोजन शनिवार दि.७ डिसेंबर २०२४ ते १२ डिसेंबर २०२४ या कालावधीत बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे रोज सायंकाळी ७ वाजता करण्यात आलेले आहे.या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत एकूण ६ नाट्यसंस्था सहभाग घेणार आहेत. कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा.त्या कलागुनांमधून व्यक्तिमत्त्व विकास घडून आणावा.नाट्यकलेचा प्रचार व प्रसार सर्व स्तरातून करावा.सांस्कृतिक वातावरण तयार व्हावे हा उद्देश ठेवून शासन राज्य नाट्य स्पर्धेचे आयोजन गेली ६२ वर्षापासून करत आलेले आहे.यावर्षी ६३ व्या वर्षात राज्य नाट्य स्पर्धा पोहोचली आहे.आपण या स्पर्धेचा आस्वाद घेण्याकरिता व कलाकारांना प्रोत्साहित करण्याकरिता बीड जिल्ह्यातील सर्व नाट्यप्रेमींनी,रसिक प्रेक्षकांनी,कलावंतांनी उपस्थित राहावे असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.




### अशी होणार नाटके

शनिवार दि.७ डिसेंबर रोजी अचानक,दि.८ डिसेंबर रोजी दुष्काळ,दि.९ डिसेंबर रोजी अजूनही उजाडत नाही,दि.१० डिसेंबर रोजी द नॉमली,११ डिसेंबर रोजी शोध निर्मुलनाचा, दि.१२ डिसेंबर रोजी दृष्टी ही नाटके रोज सायंकाळी ७ वाजता सादर होणार आहेत.

## औष्णिक विद्युत केंद्रात महापरिनिर्वाण दिन

**अभिवादन: अभियंता सुनिल इंगळेंच्या हस्ते पुष्प अर्पण**



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त परळी औष्णिक विद्युत केंद्रातील थर्मल कॉलनीत ६ डिसेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

थर्मल कॉलनी ( शक्तीकुंज) वसाहतीतील प्रेरणा वाचनालयाच्या सम्राट अशोक सभागृहात संपन्न झालेल्या या अभिवादन कार्यक्रमात सर्वप्रथम महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे मुख्य

पान २ वर...

## लोणार येथे भाजपतर्फे जल्लोष



लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणीस यांची शपथ घेतल्यानंतर लोणार येथे भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष करत आनंद साजरा केला देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली व उपमुख्यमंत्री म्हणून अजित दादा पवार व एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतली आहे या शपथविधीनंतर लोणार येथे भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी फटाकेची आतिषबाजी करून पेढे वाटून जल्लोष केला यावेळी गजानन मापारी विजू मापारी शुभम बनमेरू संतोष देशमुख मारुतीराव सुरसे अजित चौधरी गणेश लांडगे संचेती पंढरी मापारी अर्जुन रामावत निखिल मुलांगे सचिन पारस वर्मा बाळू सोळंके कैलास मापारी गोपी नेवरे पवन इंगळे गुलाब मदनकर व सर्व भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

**खळबळ** आणखी एका डॉक्टरने केला विनयभंग

# परळीत डॉक्टरकीला कुकर्माची बाधा

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी कोणत्या न कोणत्या कारणाने चर्चे त असतेच, इथले राजकारण , सामाजिक परिस्थिती ,कुटील डावपेच व सतत घडणाऱ्या क्राईम च्या घटना या मुळे परळीचा बदनामीकारक टक्का दिवसेंदिवस वाढत चालला आहे. काही दिवसापुर्वीच एका डॉक्टरने मुलीचा विनयभंग केल्याची घटना ताजी असतांनाच आता दुसरी विनयभंगाची घटना शहरात घडली आहे. हा प्रकार देखील एका डॉक्टर कडूनच घडला असल्याने परळी शहरांसह तालुक्यात चर्चे चा विषय झाला आहे. डॉक्टर व्यक्ती कडून विनयभंगा सारखे प्रकार होत असल्याने परळी च्या डॉक्टरकीला कुकर्माची बाधा झाली आहे .असे बोलल्या जात आहे . काही दिवसापुर्वी परळी शहरातील यशवंत देशमुख नामक एका डॉक्टरवर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, ह्या घटनेच्या निषेधार्थ परळी शहर एक दिवस कडकडीत बंद ठेवण्यात आले होते . हे प्रकरण तापलेले असतानाच आता परळी शहरातील बालाजी फड नामक डॉक्टर वर एका महिलेने विनयभंग व मारहाण केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी डॉक्टर सह अन्य दोन जणांवर पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, परभणी येथील झाकिर हुसेन कॉलेज जवळ राहणाऱ्या ३५ वर्षीय महिलेने एका डॉक्टरविरुद्ध विनयभंग करुन मारहाण केल्याची फिर्याद दिली आहे.या महिलेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.२ डिसेंबर रोजी सकाळी सुमारास फिर्यादी महिला व तिचा मुलगा परभणी येथून परळी येथे परमार कॉलनी येथे त्यांच्या चुलतींना भेटण्याकरीता गेले. तिला भेटुन पोलीस स्टेशनकडे जात असताना चुलतीच्या घराच्या पुढे डॉ बालाजी मुरलीधर फड यांचा दवाखाना आहे.जागेचा एकमेकात वाद असल्याने अंगावर येऊन तोंडाचा स्कॉर्प ओढला व गचांडी धरून ढकलुन दिले. खाली पडल्यावर डॉ बालाजी मुरलीधर फड व त्यांच्याकडे कामाला असलेला इसम संघपाल सोपानराव डबडे यांनी वाईट हेतुने ओढत नेऊन विनयभंग केला. शिवीगाळ व मारहाण केली.तसेच

पान २ वर...





मुंबई : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाह दीनिमित्त बीड जिल्ह्याचे भाजपा युवा नेते तथा टीम देवेंद्रचे सदस्य संभाजी सुर्वे यांनी मुंबईमध्ये अभिवादन केले. यावेळी त्यांच्या सोबत टीम देवेंद्र शिरूर (का) चे गणेश जायभाय उपस्थीत होते.



बीड: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे,लखन जोगदंड,मिलिंद सरपते,अमर ससाणे,सुहास विद्यागर,यांनी महामानवास अभिवादन केले.



बीड: महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमीत्त अभिवादन करतांना,महात्मा फुले समता परिषदकडून पुष्पहार अर्पण करताना ड. सुभाष राऊत राज्य अन्न आयोग अध्यक्ष महाराष्ट्र राज्य तथा प्रदेश उपाध्यक्ष समता परिषद. शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे, ज्ञानेश्वर राऊत, ऋषिकेश गनगे, मनोज वाघमारे आदी.

## राहुरीत महापरिनिर्वाण दिन

**कार्यक्रम:डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन**



राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी तालुक्यात महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले करण्यात आले. राहुरी बसथानक येथे वाहतूक नियंत्रक भाऊसाहेब लिहीणार यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला या वेळी स्थानक प्रमुख नियंत्रक महेश घुगे विजय वाघ पत्रकार अप्पासाहेब मकासरे संतोष लेकुरे अनिल साळवे आदी उपस्थित होते

राहुरी नगरपरिषद येथे मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी माजी नगरसेवक अक्षय तनपुरे पत्रकार विलास कुलकर्णी प्रशासकीय अधिकारी विकास घटकांबळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.टाकळीमिया येथे निलेश पटेकर यांच्या हस्ते महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला या वेळी सचीन सगळगिळे राजु सगळगिळे सुनील भिसे आदी उपस्थित होते.

## महायुती सरकारचा शपथविधी

**जल्लोष:मिठाईचे वाटप,फटाक्यांची अतिषबाजी**



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजधानीत महायुती सरकारचा शपथविधी सोहळा संपन्न होताच, कडा शहरात भाजपा कार्यकर्त्यांकडून एकत्रित येऊन मिठाईचे वाटप, फटाक्यांची

पान २ वर...